म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय
दा. क्र.

IRBK-0111453
IRBK-0111453

सं. वाचनालय, ठाणे
५२

# मराठगडी यशाचा धनी




२

दा. क्र. ११४५२
वाचनालय
३३९९
२५१२८

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

सूचना :- खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करावे



४३०९८
३३९९
२८/११/६६

# मराठा गडी यशाचा धनी

लेखक

**शंभूराव रामचंद्र देवळे**

बी.ए.,एस्.टी.सी.

प्रस्तावनालेखक

**श्री. बाबासाहेब पुरंदरे**

**श्री लेखन वाचन भांडार, पुणे २**



IRBK-0111453
IRBK-0111453

किमत दोन रुपये

अनुक्रम


| | | |
|---|---|---|
| १ | बाळाजी आवजी | ५ |
| २ | रायबागन | १५ |
| ३ | मुरारबाजी देशपांडे | २१ |
| ४ | कवींद्र परमानंद | २८ |
| ५ | गागाभट्ट | ३५ |
| ६ | आक्कण्णा आणि मादण्णा | ४६ |
| ७ | नागोजी जेधे | ५३ |
| ८ | फिरंगोजी नरसाळा | ६० |



आवृत्ती पहिली १९६६


मुद्रक : दि. दा. गांगल, लोकसंग्रह मुद्रणालय, १७८६ सदाशिव, पुणे २.

प्रकाशक : ग. ल. ठोकळ, ठोकळ भवन, लक्ष्मी रस्ता, पुणे २.



© शंभूराव रामचंद्र देवळे, ७८ शुक्रवार पेठ, आफळेवाडा, पुणे २.

3399



## लेखणी उदंड यशाची !

महाराष्ट्राच्या इतिहासात सतरावे शतक हे क्रांतिकारक शतक आहे. हे शतक संत सज्जनांच्या अभंगवाणीने मारावलेले आहे, अलौकिक मुत्सद्द्यांच्या राजकारणांनी मंतरलेले आहे. धारकऱ्यांच्या पराक्रमाने धुंदावलेले आहे. हिंदवी स्वराज्य जन्माला आले ते या शतकात, मराठी माणसे यशवंत झाली, कीर्तिवंत झाली, सामर्थ्यवंत झाली ती याच शतकात. महाराष्ट्रातील कडकडीत दैवते याच शतकात भक्तांच्या रूपाने जागृत झाली. स्वतंत्र सिंहासन निर्माण झाले, असामान्य इतिहास घडला.

हा असामान्य इतिहास घडविला मात्र सामान्य माणसांनी ! जोसपणाची आणि कुलकर्णीपणाची वतने सांभाळीत सांभाळीत संसार जोगविणारी माणसे मुत्सद्दी बनली. कुणी वकील झाला, कुणी चिटणीस झाला, कुणी मंत्री झाला. आसूड खांद्यावर घेऊन नांगर धरणारांनी हत्याराचा फाळ हाती धरून चार पातशाहया नागरून काढल्या. नवीन पातशाही घडविली. महाराज शिव-छत्रपतींसारखा अचूक ध्येयधोरणाचा आणि हिशोबी राजकारणाचा धुरंधर अग्रणी या सर्वसामान्यांना लाभला आणि ह्या सामान्यांनी असामान्य कृती करून दाखविली. हिंदवी स्वराज्यात कर्तबगारीला जातीपातीचे बंधन उरलेच नाही. अशा कर्तबगार मंडळींची संख्या अपार ! तानाजी–येसाजींच्या, अण्णाजी–निराजींच्या, बहिर्जी–नानाजींच्या, मदारी–हिरोजींच्या आणि मुरारबाजी-बाजीप्रभूंच्या रांगांच्या रांगा शिवछत्रपती महाराजांच्या मागे उभ्या राहिल्या. स्वराज्य बळवंत झाले, श्रीमंत झाले.

हा सर्व इतिहास आमच्या मुलां-बाळांना समजला पाहिजे. ही फुंकर त्यांच्या कानां-मनावर पडली पाहिजे. आमच्या नव्या स्वराज्यात अशाच कर्तृत्वाचे

आणि निष्ठेचे पाईक ह्याच इतिहासातून प्रेरणा घेऊन उठतील. हे स्वरा बलाढ्य करण्यासाठी शस्त्रज्ञ हवेत, शास्त्रज्ञ हवेत, सैनिक हवेत, बुद्धिवंत हवे नुसते पोटभरू सांगकामे नकोत. ते अभिमानी हवेत, हौशी हवेत, जिद्दीचे हवेत ती प्रेरणा त्यांना आपल्या इतिहासात लाभेल. मराठेशाहीतील अशा जिद्दीच्य कर्तबगारांना राजश्री शंभूराव देवळे यांनी आवातन दिलंय, इतिहासाच्य अस्सल कागदपत्रांत आणि बखरींत, वाचकांची वाट बघत बसलेल्या अर्धज्ञा आणि अज्ञात अशा मंडळींना त्यांनी उजव्या हाताला धरून सदरेवर आणायच ठरविले आहे. एका एका राजकार्यधुरंधराला लोडाशी बसवीत ते त्या धुरंधराचा पोवाडा वीरश्रीने गात आहेत. मराठी मुलुखातल्या बालगोपालांचा दरबार राजश्री शंभूरावांच्या शैलीवर निहायत खूष होईल, यात शंकाच न राजश्री देवळे हेही ऐसेच जिद्दीचे, हौशी कलमबाज, अक्षरे अक्षरे माहि मेळवूनच लेखणी हाती घेतात, कलमकुचराई त्यांसी ठावेच नसे.


‘ मराठी गडी यशाचा धनी ’ या मालेत आलेली माहिती ही केवळ अस्स कागदपत्रांतील आहे असे मात्र नव्हे; तर बखरींतून आलेली आणि पारंपा पद्धतीने ज्ञात असलेली माहितीही लेखकाने या पुस्तकात समाविष्ट केली आहे. ऐतिहासिक आख्यायिकांचाही त्यांनी वापर केला आहे. ऐतिहासिक थाटाघाटाची व्यक्तिमत्वे उभी करण्यात राजश्री देवळे यशस्वी झालेले पाहून मला अतिशय आनंद होत आहे. त्यांनी अशीच असंख्य व्यक्तिचित्रे रेखाटावीत, सारे बाल-सवंगडी त्यांच्या पुस्तकांच्या स्वागताला आतुर राहातील. श्रीतुळजाभवानी त्यांना उदंड यश देवो !

बहुत काय लिहिणे ? विज्ञापना, लेखनसीमा ॥

श्रीशिवराज्य शके २९३
श्रा व ण शु द्ध १
पुरंदरेवाडा, पर्वती, पुणे ९

ब. मो. पुरंदरे.

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. ११८५३ नों. दि ........
वि. ......



# १ : बाळाजी आवजी

प्राचीन काळापासून हिंदुस्थानची प्रसिद्धी सुवर्णभूमी म्हणून होती. येथील सोन्याची लूट करण्यासाठी कितीतरी आक्रमणे झाली. काही भूमार्गाने तर काही जलमार्गाने. हिंदुस्थानच्या पश्चिम किनाऱ्यावर युरोप आफ्रिकेतून आक्रमक आले. पोर्तुगीज, डच, फ्रेंच, इंग्रज आणि सिद्दी ! सिद्दींना हबशी असेही म्हणत ; कारण ते आफ्रिका खंडातल्या हबसाणातून म्हणजे ॲबिसिनीयातून आलेले होते. हिंदी किंवा युरोपातील माणसापेक्षा हबशी निराळे होते. ते धिप्पाड, उंचनिंच, हाडापेराने मोठे असे असत. त्यांचा रंग कोळशालाही लाजवील इतका काळा, केस आखूड पण राठ, ओठ मोठे आणि डोळे पाणीदार. त्यांना पाहिले की राक्षसांची आठवण व्हावी, असे त्यांचे स्वरूप. स्वरूपाप्रमाणेच त्यांचा स्वभाव असे. वृत्तीने ते क्रूर असत. दयामाया त्यांच्या गावीही नसे. ते दर्यावर्दी होते. हिंदुस्थानच्या पश्चिम किनाऱ्यावर उतरून जंजिरा येथे त्यांनी पाय रोवले. हबसाणातून आलेले काही जण आदिलशाहीत तर काही जण निजामशाहीत अधिकाराच्या जागांवर होते. त्यांपैकी मलिकअंबर, सिद्दी जौहार ही काही प्रसिद्ध नावे सांगता येतील.

सिद्दी यांनी जंजिऱ्याच्या आजूबाजूचा प्रदेश घेतला. त्यावर आपला अंमल बसविला. त्यांना चाचेगिरी करावयास दर्या मोकळा होताच. जमिनीवर त्यांच्या मनात येईल तसे राज्य! केवळ हम करे सो कायदा. तेथे ना कचेरी ना न्याय !

अशा जंजिऱ्याच्या सिद्दींच्या चाकरीत काही देशी कामगारही होते. या देशी कामगारांकडे जमाबंदी, वसुली, जकातीची वसुली, हिशोब दप्तर, मुजुमदारी असे. आवजी चित्रे नावाचे एक प्रभू गृहस्थ सिद्दीकडे नोकरीस होते.त्यांच्याकडे मुजुमदारीचे काम होते. आवजी चित्रे साधे आणि सरळ गृहस्थ. आपल्या कामात वाकबगार, चोख होते. ते इमानदार व स्वामिनिष्ठ होते. त्यांच्या या गुणाचा मालकावर चांगलाच प्रभाव होता. सिद्दीच्या दरबारात आवजी चिटणीसांना मान होता. त्यांच्या शब्दाला किंमत होती.

घरी आवजींचा संसार सुखाचा होता. त्यांना भाऊ, बायको आणि तीन मुले होती. आवजींच्या बायकोचे नाव होते रखमाबाई. त्यांना गुलबाई असेही म्हणत. बाळाजी, शामजी व चिमणाजी ही त्यांच्या मुलांची नावे होती. मुले शहाणी, आज्ञाधारक होती. त्या वेळच्या पद्धतीप्रमाणे त्यांचे शिक्षण होत होते. बाळाजीचे अक्षर फार चांगले होते. ते सुंदर अक्षर म्हणजे मोत्यांचे जणू काय सरच! घरी काही कमी नव्हते. संपत्ती होती, अधिकार होता, संतती होती, सर्व होते. आवजी चित्रे यांचे चांगले चालले होते.

कुणाचे चांगले चाललेले न पाहवणारे महाभाग सदासर्वकाळ सर्वत्र असतातच. तसे जंजिऱ्यातही होतेच. आवजीपंतांचे चांगले न पाहवून त्यांनी मनात त्यांचा द्वेष करावा. लोकांत त्यांची कुचाळकी करावी, असा प्रकार चाले.

आवजीपंतांचा मोठेपणा सहन न झालेली काही मंडळी सिद्दीच्या कानाला लागत. खोटयानाटया गोष्टी त्याच्या मनात भरवून देत. संशय निर्माण करीत. मालक अविचारी, त्यामुळे कागाळयांची शहानिशा न करता वारा प्यालेल्या वासराप्रमाणे भरकटे.

शेवटी कळस झाला ! सिद्दीच्या राज्यात मनात येईल तो कायदा आणि तोंडात येईल ती शिक्षा ! लोकांच्या कागाळया ऐकून सिद्दींनी फर्मावले, " कैद करा आवजी चित्र्याला आणि त्याच्या भावांना आणि गोणीत बांधून दर्यात बुडवून टाका त्यांना ! मुले माणसे कैद करून गुलाम म्हणून पाठवून द्या विदेशाला. घरदार वगैरे त्यांची सगळी मालमत्ता सरकारजमा करून टाका. "

हुकुमाची अंमलबजावणी ताबडतोब व कठोरपणे झाली, हे सांगावयास नकोच.

चित्रे बंधूंना गोणीतून समुद्रसमाधी मिळाली. मुलेमाणसे कैद होऊन गलबतावर गुलाम म्हणून चढली. असंतुष्ट संतुष्ट झाले, रखमाबाईचा आणि तिच्या मुलांचा वनवास सुरू झाला.

मचव्यांनी बंदर सोडले. कैद्यांनी आपल्या जीविताची व भवितव्याची आशा सोडली. कैद्यांचे सर्वस्व गेले; पण त्यांचे दैव मात्र त्यांची साथ करीत होते. त्यामुळेच की काय कोण जाणे दर्या खवळला. मचवे द्रोणाप्रमाणे वरखाली होऊ लागले. कप्तानांनी दिशा बदलली आणि जहाजे राजापूर बंदराला लागली. इथेच गुलाम म्हणून विकून पैसे करून मोकळे व्हावे म्हणून रखमाबाई व तिच्या मुलांना जहाजावरून उतरवून कप्तानाने व्यापाऱ्याकडे त्यांची विक्री करण्याकरिता दिले.

ऐन दुपारची वेळ होती. ऊन कडक पडले होते. राजापूरच्या बाजारात हबशी दलाल एका स्त्रीचा लिलाव करीत होता. सवाल बोलले जात होते. " एक वार ... दोन वार ...... दोन वार ... बोलो कोई लेनेवाला ?" व्यापारी हातवारे करीत, हेल काढीत ओरडत होता.

रस्त्याने मध्यम वयाचे साध्या पोषाखाचे एक गृहस्थ जात होते. त्यांनी विकल्या जाणाऱ्या गुलामांकडे पाहिले. त्यांच्या मनाची कालवाकालव झाली, आपण काय पाहतो आहोत,कोण विकले जात आहे. कोण त्यांना विकीत आहे, याचा विचार करायला त्यांना सवडच नव्हती; कारण लिलाव निकरावर आला होता. जास्त किंमत बोलण्यास कुणी पुढे येत नव्हते. दोन वार झाले होते.

आपले धोतर सावरीत ते गृहस्थ पुढे सरसावले. त्यांनी शंभर रुपयांना लिलाव मागितला ! बाकीच्यांनी चढाओढ लावली नाही. व्यापाऱ्याने रक्कम मागितली. ती पेठेतल्या सावकाराकडून देऊन त्यांनी गुलाम सोडवून घेतले. "ताई ...." म्हणून त्यांनी रखमाबाईंना मिठी मारली ! मुले त्या गृहस्थाला बिलगली ! सर्वांना घेऊन ते घरी आले. लिलाव घेणारे गृहस्थ होते राजापूरचे विसाजी कृष्ण तुंगारे ! ते दुसरे तिसरे कोणी नसून रखमाबाईचे भाऊच होते ! मुलांचे सख्खे मामा ! द्रौपदीची लाज राखण्यास आलेला जणू श्रीकृष्ण !

देव तारी त्याला कोण मारी ! हे खरे झाले. घरापासून दूर परदेशात कुठे तरी, कुणाच्या तरी घरी कुत्र्याच्या जिण्याने जीवन कंठण्याचे योजीत असलेली मंडळी केवळ योगायोगानेच संकटातून बाहेर पडून सुरक्षित जागी भावाच्या आश्रयाला आली.

रखमाबाईंनी घडलेली सर्व हकीकत भावाला सांगितली. भावाने तिचे सांत्वन केले. मुले मोठी होतील, सर्व चांगले होईल. धीर धरून राहा; असा दिलासा दिला. काही कमी केले नाही.

दिवसामागून दिवस जाऊ लागले. दुःख कमी होऊ लागले. मुले मोठी होऊ लागली. बाळाजीचे अक्षर चांगले होते. त्या अक्षराच्या भांडवलावर त्याला राजापूरच्या ठाणेदाराकडे कारकुनीचे काम मिळाले. पगार फक्त दहा रुपये !

राजापूरचे ठाणेदार शिद्दीचे ताबेदार होते. त्यांच्याकडे नोकरी करायला लागावी, याचे बाळाजीला फार वाईट वाटे; पण परिस्थितीमुळे त्याला इलाज नव्हता. याच सुमारास शिवाजी महाराजांनी आपल्या स्वराज्यस्थापनेला मावळाच्या कोन्यात किंचित सुरुवात केली होती. आदिलशाहीचे व मोगलाईचे छोटे छोटे लचके तोडून स्वराज्य बाळसे धरीत होते. नवे गड, कोट किल्ले बांधले जात होते. पायदळ पागा सजत होती. नौबत झडत होती. स्वराज्याचा पसारा वाढत होता. खर्चही वाढत होता. तो भागवण्याचा एक उपाय म्हणजे शत्रूच्या शहराची लूट करणे. महाराज अधून मधून या उपायाची योजना करीत.

राजापूर बंदर त्या काळी खूप भरभराटीत होते. तेथे व्यापाऱ्यांच्या वखारी होत्या. देशोदेशीचे व्यापारी आपल्या पेढ्या थाटून तेथे राहात. कोकण प्रांतातली मोहीम महाराजांनी आरंभली. शृंगारपुरचे सुर्वे आपलेसे केले. बराच प्रदेश ताब्यात घेऊन मार्च १६६१ च्या सुमारास आपला मोर्चा राजापुरकडे वळविला! तेथे असणाऱ्या श्रीमंतांची लूट केली. मालांनी

भरलेल्या वखारी त्यांनी रिकाम्या केल्या. राजापूरच्या लुटीत सोने-नाणे तर मिळालेच. पण त्याबरोबरच रुपे, पितळ, शिसे, लोखंड, कथील हे धातू व त्यांच्या निरनिराळ्या वस्तू, काचेच्या वस्तू, मोती, हिरे, निरनिराळी रत्ने. गेंड्यांची शिंगे, हस्तीदंत, कस्तुरी, केशर, सुगंधी द्रव्ये व तेले, वेलदोडे, लवंगा, मिरी व मसाल्याचे पदार्थ, सुकामेवा, हळद, सुपारी, मोरचूद, शेंदूर पारा, गंधक, विषे, औषधे, अफू, गांजा अशा किती तरी वस्तू लुटीत मिळाल्या. त्या वस्तू घोड्यांवर व बैलांवर लादून महाराजांनी स्वराज्यात रवाना केल्या. राजापूरच्या ठाणेदाराची नोकर माणसे पकडली. त्यांची छाननी चौकशी करता शिवाजी राजांना आणखी एक हिरा सापडला. तो म्हणजे ठाणेदाराचा लेखनिक बाळाजी आवजी !

महाराजांनी त्यांच्या आईला अभय दिले, आश्वासन दिले. तिघा भावांना आपल्या नोकरीत घेतले. बाळाजीने मोठ्या आनंदाने महाराजांची चाकरी स्वीकारली. मनोभावे काम केले. त्यांची कार्यतत्परता व निष्ठा पाहून महाराजांनी बाळाजी आवजीस राज्याची चिटणीशी दिली. दुसरा भाऊ चिमणाजी यास दप्तरदारी दिली व शामजीला रायगड किल्ल्याची कारखानविसी दिली.

महाराजांचा परकी राज्याशी होणारा पत्रव्यवहार बाळाजी चतुरपणे करीत. महाराजांचा बाळाजीवर इतका विश्वास बसला की खाजगी मसलतीत ते त्यांना घेत. त्यांचा सल्ला घेत. प्रसंगविशेषी महाराज बाळाजींना स्वारीवरही नेत. महाराजांनी सुरत लुटली त्या वेळी बाळाजी आवजी यांना महाराजांनी बरोबर घेतले होते.

एकदा शिवाजी महाराजांनी बाळाजी आवजी चिटणीस यांना काही महत्त्वाचे आणि घाईने धाडण्याचे पत्र लिहून ठेवण्यास सांगितले. थोडा वेळ गेल्यावर महाराज म्हणाले, " चिटणीस, पत्र लिहून झाले असेल; ते आम्हांला वाचून दाखवा.



वेळ सायंकाळची होती. बाळाजीने आपल्या अंगरख्याच्या खिशातून गुंडाळलेला कागद काढला; आणि दिवटीच्या प्रकाशात खडा खडा वाचून दाखविला. पत्रातील मजकूर यथातथ्य लिहिलेला पाहून महाराजांना आनंद झाला आणि त्यांनी बाळाजीला शाबासकी दिली. हे पाहून दिवटयाला हसू आले. महाराजांच्या ते लक्षात येताच त्यांनी हसण्याचे कारण दिवटयाला विचारले.

आता महाराजांना काय उत्तर द्यावे, हे दिवटयाला सुचेना. खरे कारण सांगावे, तर बाळाजीची चुगली होते, ते न सांगावे तर महाराजांची अवज्ञा केल्यासारखे होते. इतक्यात बाळाजीच म्हणाला, "महाराज, क्षमा करा. पत्र लिहून झाले नव्हते. पण आपण ते वाचायला सांगितलेत, तर कोरा कागद पुढे धरून मी ते पत्र वाचले. ते पाहून दिवटया हसला असेल. चूक माझी आहे. क्षमा करा. पत्र आताच लिहून आणतो."

"होय, त्याच कारणाने मला हसू आवरेना." दिवटया म्हणाला.

" बरे तर, आताच पत्र लिहून आणा बरे!" महाराज चिटणीसांना म्हणाले. बाळाजीने तातडीने पत्र लिहून आणले आणि वाचून दाखविले. ते मघाशी वाचून दाखविलेल्या पत्रापेक्षा सरस झाले होते. पत्रातील मुद्देसूदपणा आणि मोत्यासारखे अक्षर पाहून महाराज अगदी प्रसन्न झाले. त्यांनी मोत्याचा कंठा, मौल्यवान पोषाख, पदक आणि शिरपेच बक्षीस देऊन चिटणीसांचा यथोचित गौरव केला.

अनेक श्रमसायासांनी स्वराज्य वाढले. शिवाजीराजांनी दक्षिणच्या चारी बादशाहया दबविल्या, गड, कोट, किल्ले, फौज, लष्कर सर्व नवीन सरंजाम तयार केला. राज्यात नीटनेटकी व्यवस्था केली. लोक राजी राखले. साधू, संत, फकीर यांची सरबराई केली. सर्व झाले. पण शिवाजी राजांना सिंहासन नव्हते. राज्याभिषेक झालेला नव्हता. महाराष्ट्रातील शहाण्णव कुळीपैकी काही मराठे होतेच. ते शिवबांना राजे मानण्यास तयार नव्हते. कित्येक शतके राज्याभिषेक विधी महाराष्ट्रात न झाल्याने येथील ब्राह्मणही शास्त्रोक्त राज्याभिषेक करण्यास तयार नव्हते.

बाळाजी आवजी यांच्या नेतृत्वाखाली केशवभट पुरोहित, भालचंद्र भट ही मंडळी उत्तर हिंदुस्थानात गेली. ठिकठिकाणी शोध करून त्यांनी महाराजांच्या कुळीचा उत्तम शोध केला. तेव्हा ते शिसोदे वंशातील आहेत, निश्चित झाले. शिसोदे राजपूत हे क्षत्रिय. म्हणून भोसले हे क्षत्रिय असून त्यांना शास्त्रोक्त पद्धतीने राज्याभिषेकाचा अधिकार आहे ही गोष्ट बाळाजीने आपल्या खटपटीने सिद्ध केली. गागाभट्ट या प्रसिद्ध विद्वानांची त्यांनी मान्यता मिळविली.

सर्व तयारी होऊन महाराजांना ज्येष्ठ शुद्ध १३ शके १५९६ या शुभ मुहूर्तावर राज्याभिषेक झाला. कित्येक शतकानंतर हा आनंद सोहळा महाराष्ट्रात घडला. तो पार पाडण्यासाठी अनेकांनी खूप मेहनत घेतली. बाळाजी आवजी यांच्या खटपटींना तर उपमाच नाही. महाराज चिटणीसावर खूष झाले. महाराजांनी त्यांना अष्टप्रधानांपैकी एखादे पद देऊ केले. पण चिटणीस यांनी या पदापेक्षा चिटणीसीच वंशपरंपरेने मागून घेतली. महाराजांनी त्यांना म्हटले. " तुम्ही निष्ठेने स्वामीसेवा करून श्रमसाहस पुरे केले. राज्यवृद्धीचे कामी आला. यावरून कृपाळू होऊन अष्टप्रधानांतील पद द्यावे असे मनीं धरले असता तुम्ही विनंती केली, आपणाकडे चिटणीशीचा दरक चालत आहे तो अक्षय वतनी वंशपरंपरेने सर्व राज्यातील चालवावा. यावरून तसे तुम्हांकडे दिले असे. पुत्रपौत्री अनुभविणे. . . . ."

याप्रमाणे बाळाजी आवजी मराठी राज्याचे चिटणीस झाले.

समारंभ प्रसंगी प्रधानांना कोणती वस्त्रे व वस्तू द्यावयाच्या याचे रिवाज महाराजांनी बांधून दिले. त्यात चिटणीस यांच्या हक्काची नोंद केली आहे. ती अशी :


चिटणीस यांना वस्त्रे ५ : १ मंझील, १ झगा, १ ईजार, १ दुपेटा,१ दुमजन तसेच ३ दागिने, १ कंठी मोत्याची, १ चौकडा व शिरपेच. शिवाय रुप्याच्या पेटीचे कलमदान, रुप्याच्या दांडीची चौरी व ४ घोडा. अशा वस्तू द्याव्या असा रिवाज महाराजांनी ठरविला.

बाळाजींनी महाराजांची सेवा अत्यंत निष्ठेने केली. काही दिवसांनी महाराजांना आजारीपण आले, महाराजांनी आपले सरकारकून, सेनापती, चिटणीस यांना जवळ बोलावून राज्याची व्यवस्था कशी करावी याबद्दल सूचना दिल्या. महाराज कैलासवासी झाले. सर्वांना मोठा शोक झाला. तो आवरून महाराजांनी सांगितल्याप्रमाणे व्यवस्था करण्याच्या कामास मंडळी लागली. संभाजीराजे पन्हाळ्यावर कैदेत होते. त्यांना तिथेच ठेवून राजारामास गादीवर बसवून राज्य चालविण्याचा मंडळीचा विचार होता. पण तो फसला. संभाजीस या बेताची बातमी कळून त्यांनी अण्णाजी दत्तो, त्यांचा भाऊ सोमाजी दत्तो, हिरोजी फर्जंद, मोरोपंत पिंगळे, बाळाजी आवजी यांना कैद केले. त्यांच्या पायांत बेड्या ठोकल्या. अविचाराने कोणाला हत्तीच्या पायी, तर कोणास कडेलोट करून ठार केले. बाळाजी आवजी यांना संभाजीने परळीजवळ ठार केले ! महाराजांच्या परम विश्वासू चिटणीसांचा शेवट असा विलक्षण रीतीने झाला ! स्वराज्याच्या कामी जी बुद्धिमत्ता उपयोगी पडावयाची ती स्वतः छत्रपतींच्या हाताने तोडून मोडून गेली. हाही एक बाळाजी आवजींच्या आयुष्यातील दुष्ट योगायोगच ! त्यांचे शहाणपण स्वराज्याच्या नशिबी नव्हते, दुसरे काय ?

" दैवमन्यत्र चिंतयेत् " हेच खरे !

□ □ □

# २ : रायबागन



विजय छोटा असो की मोठा असो, तो विजयी माणसाचे डोके धुंद करून टाकतो, इतके मात्र खरे ! वास्तविक चाकणचा किल्ला म्हणजे केवळ भुईकोट किल्ला. चार बुरूज आणि पंधरा-वीस हात उंच कच्च्या मातीच्या भिंती ! या किल्ल्यावर मोगल सैन्याचा समुद्र कोसळला. दिवस दोन दिवसांतच किल्ला शरण यावयास हवा होता; पण किल्लेदार आणि त्याचे सहकारी भारीच चिकट. हालअपेष्टा, हल्ले, मोर्चे, गोळ्यांचा भडिमार, या सर्वांना तोंड देत किल्ल्याने तीन महिने दाद दिली नाही ! शाइस्तेखान इरेलाच पडले ! शेवटी इसवी सन १६६० च्या ऑगस्ट महिन्यात चाकणचा किल्ला मोगलांनी जिंकला. खानांना विजय मिळाला. त्या विजयाने ते धुंद झाले ! बेहोष झाले ! त्यांनी फौजेला शिवाजी राजाच्या पुण्याकडे कूच करण्याचा हुकूम दिला.

हुकुमाबरहुकूम दळभार हलू लागले. घोडेस्वार दौडत निघाले. अवजड सामान लादलेले हत्ती गळ्यांतील घंटांच्या नादात डुलत डुलत चालले ! हत्तींना मागे टाकीत जंबुऱ्याचे उंट, लांब टांगा टाकीत चालले. तोफा, खजिन्याच्या पेट्या निघाल्या. आडदांड अफगाण शिपाई पाहून रस्त्याच्या कडेच्या

खेड्यांतील पोराटोरांची गडबड उडाली. शाइस्तेखानाच्या लष्करात बरीच मराठे मंडळीही होती. शिंदखेडचे जाधवराव म्हणजे शिवाजीराजांचे आजोळ घराणे, त्यांचीही पथके होती. घाटगे, काकडे, खंडागळे, पवार, कोकाटे, एक वा दोन कितीतरी ! या सर्व लोकांत एक शूर स्त्रीही आपले सैनिक घेऊन सामील झालेली होती. तिचे नाव 'रायबागन.' 'रायबागन' याचा अर्थ राजव्याघ्री किंवा वाघीण ! एक वेळ वाघ परवडला पण वाघीण फार भयंकर. शिवाजीराजांना जिंकण्यासाठी ही 'रायबागन' वऱ्हाडमधून मुद्दाम आलेली होती.

'रायबागन' हा त्या स्त्रीला औरंगजेबाने दिलेला किताब होता. बादशाहांची सेवाचाकरी करताना तिने जो पराक्रम गाजविला, त्यासाठीच बादशाहांनी तिला हा किताब दिलेला होता.

ही 'रायबागन' वऱ्हाडातील उदाराम घराण्यातील होती. वऱ्हाडात शिंदखेडच्या जाधवराव यांच्या घराण्याच्या इतकेच मोठे घराणे उदारामाचे होते.

उदाराम यांचे मूळ नाव उद्धवराव. त्यांच्या वडिलांचे नाव रामजीपंत. या दोन्ही नावांचा अपभ्रंश 'उदाराम' असा झाला. उद्धवराव वाशीमचे राहणारे. वाशीम जवळच्या सावरगाव, चिवरे या गावचे कुलकर्णीपण त्यांच्याकडे असे. हे देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण होते. उद्धवराव कुलकर्णी कामात तर प्रवीण होतेच, पण त्याबरोबरच त्यांना संस्कृत, फारशी आणि अरबी चांगले येत होते. कुलकर्णीपणाच्या उत्पन्नावर भागेना म्हणून नशीब काढण्यास ते दिल्लीला गेले. त्यांनी सरकारी कचेरीत उत्तम काम केले. तेथे चढत चढत शेवटी ते पंचहजारी मनसबदार झाले. लष्करी कामात त्यांनी वेळोवेळी चोख कामगिरी

केली. तिच्या मोबदल्यात त्यांना वाशीमची आणि माहूरची देशमुखी मिळाली.

उद्धवरावांनी वाशीमचा आणि माहूरचा कारभार हाती घेण्यापूर्वी तेथे अंदाधुंदी होती. तेथे हरचंदराय नावाचे राजपूत कारभार पाहत. मुलूख ओसाड होता, शेती पिकत नव्हती. उत्पन्न मिळत नव्हते. उद्धवरावांनी परिश्रम करून प्रदेशाचे उत्पन्न वाढविले. शेतीभाती चांगली पिकू लागली. उद्धवरावांनी हरचंदाला आपल्या फौजेच्या जोरावर हाकून लावले. पण त्याचा पूर्ण बंदोबस्त होण्यापूर्वीच उदाजीराम वारले! घरात त्यांची पत्नी आणि लहान मूल होते.

हरचंदाने वाशीम-माहूरच्या प्रदेशात धुमाकूळ घालण्यास सुरुवात केली. आपल्याला आता कोण अडविणार? अशी त्याची समजूत होती. पण ती थोड्याच दिवसांत खोटी ठरली.

उदारामाच्या पत्नीने आपले सैन्य जमा केले. "आपल्या बहिणीची लाज राखा, नाही तर चोळ्या घालून बांगड्या भरा," असे म्हणून तिने सैनिकांना चेतविले. निशाणाला चोळी लावली आणि हरचंदावर तिने मोहीम काढली. त्यात हरचंदाचा पराभव झाला. तो वाशीमचा आणि माहूरचा प्रदेश सोडून कायमचा निघून गेला.

औरंगजेबाला ही हकीगत कळल्यावर त्याला बाईचे खूप कौतुक वाटले. त्याने बाईचा गौरव केला. तिला 'पंडिता' व 'रायबागन' असे दोन किताब दिले! बाई बादशाहांची छोटी मोठी कामे करू लागली.

शिवाजी महाराजांवर औरंगजेबाने शाइस्तेखानांना पाठविले. त्यांत जे अनेक मराठे आणि हिंदू सरदार होते त्यांच्यांत 'रायबागन' सुद्धा आपला मुलगा घेऊन सामील झाली होती!

चाकण जिंकून शाइस्तेखान फौजेसुद्धा पुण्यास पोहोचला; त्यामुळे पुण्याचे स्वरूप पार पालटून गेले. पुण्याभोवती सैन्याचे तळ पडले ! वाहने, घोडे, उंट, हत्ती, यांची रहदारी रस्त्यावर सुरू झाली ! शिवबांचा अंमल पुण्यातून आणि आजूबाजूच्या प्रदेशातून उठला. मोगल सैन्याचा उपद्रव महाराजांच्या प्रदेशाला अतिशय लागला.

पावसाळा संपायला आला. शाइस्तेखानाने आपल्या फौजेतील शूर आणि अनुभवी करतलबखानाला बोलाविले. त्याचा गौरव केला आणि त्याला कोकणची मोहीम सांगितली. घाट उतरून चौल, कल्याण, भिवंडी, पनवेल या मुलुखावर अंमल बसविण्यास त्याला फर्माविण्यात आले. करतलबखानाच्या मदतीसाठी काही राजपूत सरदार, जाधवराव आणि शूर 'रायबागन' यांची नेमणूकही खानाने केली.

निघण्याची तयारी झाली.सुमारे तीस हजार फौज हलली. तोफांचे गाडे चालू लागले. हत्ती, उंट, घोडेस्वार यांच्या चालण्याने मावळातील लाल मातीचे लोट आभाळात गेले. चिंचवड, तळेगाव, वडगाव या गावावरून फौज चालली. रस्त्यात त्यांना कोणी अडविले नाही, की त्यांच्यावर छोटा-मोठा हल्लाही झाला नाही. करतलबखान निर्भयपणे चालला होता.

मळवलीपुढील मार्ग मात्र अवघड होता. लोहगडापासून कोकणात जाणारी वाट उंच डोंगरावरून, झाडाझुडपातून जात होती. वाट केवळ पाऊल वाटेसारखीच. सभोवती दाट किर्र जंगल ! दिवसासुद्धा नवख्याला भीती वाटावी असा मार्ग !

आडदांड मोगल शिपायांना डोंगराचे चढ चढता चढता नाकी नऊ आले. सैन्य तुंगारण्यात पोहोचले. उंबर खिंड लांब

होती. ऐन जंगलात मोगल फौज येताच जंगलाचा नूर पालटला ! शिंगांचे कर्कश आवाज झाले, ताशे, नौबती वाजल्या.




इशारतीचे आवाज होताच किर्र झाडीतून 'हरहर महादेव' हा जयघोष उठला. झाडा-झाडांतून, जाळीजाळीतून, हातांत तरवारी घेऊन मावळे सैन्य मोंगलांच्यावर तुटून पडले. समोरून, बाजूंनी, पुढून, मागून, एवढेच नव्हे तर झाडांवरूनही ! जसे गांधील माशांचे पोळेच ! सर्वत्र लढाई पेटली. कत्तल सुरू झाली. पळून जायला वाट नव्हती. पळण्यासाठी पुरेसा वेळ नव्हता. फौजही चालून थकलेली. त्यांत मराठ्यांच्या मदतीला सूर्य-नारायण धावले. उन्हाचा कडाका सुरू झाला. अंगातून घामाच्या धारा थांबेनात. घशाला कोरड पडली ! पण अफसोस ! घोटभर पाणीही कुठे मिळेना. मोठी दैना झाली. करतबलखान आपल्या सैनिकांना लढण्याचे हुकूम देत होते. पण त्यांचे सैनिक चित्रासारखे उभे होते. खानांच्या बाजूला 'रायबागन' होती ! वाघीण पण घाबरली ! ती खानांना दोष देऊ लागली.

"एवढी मोठी बादशाही फौज तुम्ही अविचाराने सिंहाच्या तोंडात आणून सोडली," असे ती म्हणाली.

खानांच्या तोंडचे पाणीच पळाले. रायबागनने त्यांना मोलाचा सल्ला दिला. "लढाई थांबवा ! शिवाजी महाराजांना शरण जा ! " तिचा सल्ला मानून करतलबखानाने आपला वकील शिवाजी महाराजांकडे पाठविला. त्याने मोठ्या काकुळतीने दयेची याचना केली. मोठ्या मनाने महाराजांनी लढाई थांबविली. मोठी लूट मिळाली. हत्तीघोडे उंट खजिन्याचे पेटारे, सोनेनाणे, शस्त्रें, कितीतरी सामान मिळाले. महाराजांच्या मेहरबानीमुळेच केवळ अंगावरच्या वस्त्रानिशी करतलबखान खाली मान घालून तुंगारण्यातून बाहेर पडला. खानाबरोबरच रायबागनच्या सैन्याचाही पराभव झाला. तिच्या सैन्यांतील दोन हजार घोडे आणि पाच हत्ती महाराजांच्याकडे पाडाव झाले. स्वतः रायबागन आणि तिचा मुलगा हेही महाराजांच्या हाती सापडले !

शिवाजी राजे गुणी होते. त्यांनी रायबागनच्या शौर्याची आणि धैर्याची तारीफ केली. आपला आदर दाखविण्यासाठी महाराजांनी तिला बहुमोल वस्त्रे दिली आणि राहिलेल्या सैन्यासुद्धा तिला वऱ्हाडात पाठवून दिले. बाईनेही आपला वृथाभिमान सोडून आपणास महाराजांची धर्मकन्या म्हणवून घेतले. तिच्या धारिष्टामुळेच करतलबखान जिवानिशी वाचला. मोंगलसैन्याचा चाकणच्या विजयाचा कैफमात्र साफ उतरला!

# ३ : मुरारबाजी देशपांडे



सामोपचाराची बोलणी संपून शेवटी लढाईचा गदारोळ उठलाच ! चंद्रराव मोऱ्यांच्या मुलुखावर चहूबाजूंनी चढाई सुरू झाली. चहूकडून भयंकर हल्ला झाला म्हणून मोरे गडबडून मुळीच गेले नाहीत. त्यांच्याजवळ घोडदळ आणि पायदळ पुष्कळ होते. दळातील लोक शूर तसेच स्वामिनिष्ठही होते. सर्व बाजूंनी लढाईचा गदारोळ उठला. मोऱ्यांचे सैन्य हल्ल्याला तोंड द्यायला सरसावले. जावळीचे रान रणगर्जनांनी भरून गेले. तरवारी आणि पट्टे यांची हातघाई सुरू झाली. बंदुकांचे बार दऱ्याखोऱ्यांत घुमू लागले. कापाकापी सुरू झाली. मोऱ्यांच्या तर्फे एक पठ्ठा या वेळी हिरीरीने लढत होता. त्याचे हत्यार श्रीकृष्णाच्या सुदर्शनाप्रमाणे चालले होते. त्यांनी आपल्या पराक्रमाची शर्थ केली; पण त्यांच्या वाट्याला यश आले नाही. शिवाजी महाराजांच्या सैन्यापुढे हिरीरीने लढणारा पठ्ठा हतवीर्य झाला ! तो वीर आणि चंद्रराव मोऱ्यांची मुलेमाणसे शेवटी महाराजांच्या हाती पडली ! हा वीर पुरुष म्हणजेच मुरारबाजी देशपांडे ! शिवाजी राजे मुरारबाजीच्या पराक्रमावर खूष झाले ! त्याची स्वामिनिष्ठा पाहून महाराजांचे मन प्रसन्न झाले. हे रत्न आपल्या पदरी जोडले पाहिजे असे त्यांनी मनाने ठरविले.

चंद्रराव मोऱ्यांची मुलेमाणसे महाराजांच्या हाती पडली होती. " मला मुरारबाजी द्याल, तर मुलेमाणसे वाचतील, " असा कौल महाराजांनी दिला. मुरारबाजी शेवटी महाराजांच्याकडे रुजू झाले. महाराजांच्या जवाहरखान्यात एका अमोल रत्नाची भर पडली !

शिवाजी महाराजांनी मुरारबाजींची समजूत घातली. स्वराज्याच्या कार्याची त्यांच्या मनावर मोहिनी बसली. मुरारबाजींना महाराजांचे म्हणणे पटले. ते महाराजांच्या सेवेत रुजू झाले.

मुरारबाजी देशपांडे हे महाडचे राहणारे ! त्यांचे वडील बाजी देशपांडे हे सुद्धा चंद्रराव मोऱ्यांच्याकडे नोकरीस होते. मोऱ्यांची पथके विजापूरकर आदिलशाहाच्या बाजूंनी लढाईत भाग घेत. मोगलांशी झालेल्या मोहिमांत बाजी देशपांडे यांनी मोऱ्यांच्यातर्फे विजापूरकरांच्या बाजूने खूप पराक्रम गाजविला. त्या पराक्रमाने बादशाहा खूष झाले. त्यांनी बाजी देशपांडे यांना आपल्या नोकरीत घेतले. उमराव म्हणून किताब दिला, नेमणुका व इनाम दिले. बाजी देशपांडे बादशाही नोकरीत रुजू झाले. त्यांनी आपल्या मुलांना मोऱ्यांच्याकडे चाकरीस दिले. बाजी देशपांड्यांचे थोरले चिरंजीव मुरारपंत. त्यांचा जन्म इ. सन १६१६ च्या सुमारास झाला. मुरारजीला आणखी चार भाऊ होते. त्र्यंबकजी, शंकराजी, संभाजी व महादजी अशी त्यांची नावे होती.

शिवाजी महाराजांनी मुरारबाजींना आपल्या नोकरीत घेतले. त्यांचा सन्मान केला. स्वराज्यामधील महत्त्वाच्या अशा पुरंदर किल्ल्याची किल्लेदारी त्यांनी मुरारबाजींना दिली.

किल्लेदारीची ती कामगिरी त्यांनी फारच चांगल्या रीतीने सांभाळली.

शिवाजी राजांचे दिल्लीच्या मोगलांशी भांडण चालले होते. औरंगजेब बादशाहांनी शाहिस्तेखानाला पाठविले. त्याच्या गोटात शिरून छापा घालून महाराजांनी त्याला फजीत केले. मोगलांची सुरत महाराजांनी निर्भयपणाने लुटली. सिंहगड घेण्यासाठी आलेले मोगल सरदार जसवंतसिंह शेवटी हात हालवीत परत गेले. या सर्व प्रकारांनी औरंगजेब पूर्ण फजीत झाले ! मोगल बादशाहीची इतकी बेइज्जत कोणी केली नव्हती ! बादशाहा इरेला पडले. त्यांनी आपल्या पदरचा सर्वांत मोठा उत्कृष्ट सेनापती या कामी योजण्याचे ठरविले. जयपूरचे मिर्झा राजा जयसिंग यांची शिवाजीवर स्वारीसाठी नेमणूक झाली. शहाजहान बादशाहांच्या वेळेपासून हिंदुस्थानात आणि हिंदुस्थानच्या बाहेर त्यांनी खूपच अनुभव मिळविला होता. अनेक महत्त्वाच्या जागी त्यांची नेमणूक झाली होती. पण अपयश त्यांच्या गावीही नव्हते. असा अखंड विजयी आणि अनुभवी वीर शिवाजीवर मोगलांतर्फे चालून आला. कडवा पठाण सरदार दिलेरखान हाही त्याच्याबरोबर स्वारीवर निघाला. " बादशाहांनी स्वतःच जावे, असा आणीबाणीचा प्रसंग आहे. त्यासाठी तुम्हांस पाठवितो, " असा बादशाहांनी त्यांचा गौरव केला. त्यांच्याबरोबर आणखीही अनेक शूर आणि कर्ते सेनापती होते. प्रचंड फौज,तोफखाना घेऊन शिवाजी महाराजांना जिंकण्यासाठी राजे जयसिंग निघाले ! " प्रचंड दळभार निघाला. आकाशापर्यंत एकच धुराळा उठला. सेनासमुद्रच जणू दक्षिण गिळायला चालला. मुक्काम पडला की तो सैन्याचा तळ मोठ्या गावासारखाच भासत असे. "

मिर्झा राजे जयसिंग दक्षिणेत आले. तेव्हा दख्खनचा सुभेदार म्हणून शहाजादा मुअज्जम होता. शहाजाद्याचा निरोप घेऊन सैन्यासह राजे जयसिंग पुण्याकडे निघाले. हाती घेतलेली मोहीम यशस्वी रीतीने चालविता यावी यासाठी त्यांनी बादशाहाकडून विशेष अधिकार मागितला. बादशाहाला एक खलिता पाठविला. ते लिहितात, " सैन्यातील लोकांचे बरेवाईट करणे सेनापतीच्या हाती हवे. सैनिकांना त्यांच्या कामाबद्दल बक्षीस देणे, त्यांच्या नेमणुका करणे, बदल्या करणे, त्यांना बढत्या देणे हे सर्व अधिकार माझ्याकडे द्यावे म्हणजे स्वारीची कामे नीटनेटकी पार पाडता येतील." बादशाहांनी अशा तऱ्हेचे अधिकार त्यांना दिले.

शिवाजी राजांचे राज्य त्या वेळी फारच लहान होते. मोकळा मुलूख जिंकून घेऊन किल्ल्यांची रसद बंद करून राजाला जेरीस आणावे असे मिर्झा राजे जयसिंग यांनी योजले. राजे जयसिंग यांनी आपल्या सैन्याच्या तुकड्या महाराजांच्या छोट्या राज्यात निरनिराळ्या ठिकाणी पाठवून रस्ते अडवून धरले. घाट, वाटा बंद केल्या. प्रांतातील दळणवळण संपुष्टात आणले. जो मुलूख व्यापला तो जाळूनपोळून फस्त करून दरारा बसविला.

राजे जयसिंग याजबरोबर असणाऱ्या दिलेरखानाचे विचार मात्र निराळे होते. शिवाजीचे बळ त्याच्या गडकोट-किल्ल्यांत आहे. हे सर्व किल्ले काबीज केले की त्याचे राज्य संपुष्टात आलेच. हा विचार दोघांनी अमलात आणण्याची पराकाष्ठा चालविली. स्वराज्यावर मोठे संकट कोसळले. मिर्झा राजे जयसिंग इ. स. १६६५ च्या मार्च महिन्यात पुण्यास येऊन

दाखल झाले. मोहिमेत यश मिळण्यासाठी त्यांनी कोटी चंडीचे होमहवन, शिवलिंगार्चने केली. होमहवन, दान, धर्म इत्यादी प्रकारे त्यांनी दैवी शक्तीची आराधना केली.

किल्ले काबीज करण्याची दिलेरखानाची योजना मिर्झा राजे यांनी मंजूर केली. मोहिमेसाठी त्यांनी पहिला गड निवडला तो म्हणजे किल्ले पुरंदर !

पुरंदरचा किल्ला खूप जुना. अत्यंत मजबूत. त्यावर मोगलांची धाड आली. आघाडीवर दिलेरखान होता. तो सासवड-पावेतो गेला असेल नसेल तोच मराठ्यांच्या टोळ्यांनी त्यावर हल्ला केला. फौजेत फौज मिसळली. कापाकापी झाली. आरडा-ओरडा झाला. मोगल फौज स्वतःस सावरून उभी झाली. तोच मराठे पुरंदर आणि जवळचा वज्रगड यांच्या रोखाने परत फिरले. दिलेरखान त्याचा पाठलाग करीत किल्ल्यापर्यंत आला तर किल्ल्यावरून तोफा बंदुकांच्या गोळ्यांनी स्वागत झाले. तो मार सहन करून दिलेरखान गडाच्या पायथ्यापाशी राहिला. त्याच्या पाठोपाठ मोगल सैन्याचा मोठा तळ पडला.

मोगल सैन्याजवळ मोठा तोफखाना होता. तोफांचा मारा करून मोगल सैन्याने वज्रगड ऊर्फ रुद्रमाळ किल्ला घेतला. तोफा चढवून पुरंदरची माचीही जवळ जवळ घेतली. शत्रूच्या फौजेचा दाब किल्ल्यातील मराठी फौजेवर जबर पडू लागला. बाहेरून मदत यावी, तर शत्रूने मार्ग रोखून धरलेले. अपयश येण्याचा प्रसंग आला; पण मराठी फौज डगमगली नाही. मराठी फोजेचे नेतेपण करीत होते मुरारबाजी देशपांडे. त्यांनी एक धाडसाची योजना आखली. शिबंदीपैकी कडवे असे सुमारे सातशे सैनिक निवडून त्यांनी दिलेरखानावर सरळ हल्ला

चढविला. सुमारे पाच सात हजार पठाणांवर सातआठशे मराठे तुटून पडले. रणकल्लोळ उडाला. शस्त्रास्त्रांची खणाखणी सुरू झाली. रक्ताचा अभिषेक गडास झाला. मोगल सैन्याला कापीत, मागे लोटीत मुरारबाजी आणि त्यांचे सहकारी थेट दिलेर-खानाच्या छावणीपाशी धडकले. पठाण आणि मराठे दोघेही आप-आपले बळ पणाला लावून लढत होते. दोन्हीकडचे लोक पडत होते. पण कोणी मागे हटण्यास तयार नव्हते. छोटचा शक्ती-निशी सामना देत असलेल्या मुरारबाजीचे अद्वितीय शौर्य आणि निष्ठा पाहून दिलेरखान चकितच झाला. त्याची बहादुरी पाहून खानाचे डोळे दिपले. त्याने ओरडून मुरारबाजीला थांबावला सांगितले.

लढाईचा आवेश चढून बेभान झालेला मुरारबाजी शत्रूचे थांबण्याचे आवाहन ऐकून क्षणभर थांबला. त्याच्या अंगावर कित्येक घाव लागलेले होते. रागाने डोळे लाल झाले होते. चेहरा उग्र दिसत होता. तांडवनृत्य करणाऱ्या शिवाप्रमाणे मुरारबाजी भासत होता. दिलेरखानाने मुरारबाजींना कौल दिला ! लढाई थांबविण्याचे आवाहन केले.

"तुम सच्चे बहाद्दूर हैं ! मैं तुम्हारी बहादुरीपर खूष हूँ । आजिये हमारे साथ । तुम्हारे बहादुरीकी हम कदर रखेगा । मैं तुम्हारी शान रखेगा !" दिलेरखानाचे हे शब्द ऐकून मुरारबाजी आणखी संतापले ! शत्रूचे फितूर होण्याचे आवाहन त्यांना अपमानास्पद वाटले. ते पुनः मोगलांच्या फौजेवर तुटून पडले. दिलेरखानाच्या रोखाने ते बाणाच्या त्वेषाने धावले. त्यांच्या हातांतील पट्ट्यांना किती तरी जण बळी पडले ! आता हे ऐकणार नाहीत, हे पाहून दिलेरखानाने बाण टाकला. तो


मुरारबाजींच्या कंठात खसकन घुसला. बाणाने आपले काम चोख केले. मुरारबाजीची मान छेदली गेली. शरीर सोडून प्राण



पंचत्वांत विलीन झाले! जड शरीर स्वराज्याच्या मांडीवर कोसळले. अशी आख्यायिका सांगतात की, शिरच्छेद झाल्या-नंतरही मुरारबाजीचे धड लढतच राहिले! ते सत्य असेल तर स्वामिनिष्ठेचा आणि प्रचंड कर्तव्यनिष्ठेचा तो चमत्कारच म्हटला पाहिजे. मुरारबाजी पडले; पण त्यांच्या क्षात्रतेजाने शत्रूचे डोळे दिपले. देशरक्षणाचे कंकण हाती बांधणारासाठी एक देदिप्यमान आदर्श इतिहासाने त्यांच्या रूपाने दिला. हा आदर्श देशाचा मोठा ठेवा आहे. मुरारबाजी त्या ठेव्याच्या रूपाने अमर आहेत.

□ □ □

# ४ : कवींद्र परमानंद



" शास्त्रीबोवा कुठे निघालात इतक्या घाईघाईने आज सकाळीच ? पूजापाठ, संध्या, ब्रह्मकर्म यांना आज तिलांजली दिलीत की काय ? " गडबडीने जाणाऱ्या एका शास्त्रीबुवांना दुसरे शास्त्री विचारीत होते.

" म्हणजे ? तुम्हांला नाही ठाऊक ? अहो महाराज, साऱ्या काशीक्षेत्रभर कालपासून वार्ता पसरली आहे, आणि तुम्हांला तर त्या वार्तेचा गंधही दिसत नाही ! " घाईघाईने चाललेले पहिले शास्त्री बोलले.

" कसली वार्ता बुवा ? कुठे मोठे अनुष्ठान आहे का कुठे कीर्तनप्रवचन आहे ? मला काही आमंत्रण नाही. "

" अहो, तुम्ही तरी अगदी विचित्र आहांत बुवा ! तुमचे सारे लक्ष अनुष्ठान, पारायण आणि दक्षिणा यातच ! अहो, नीट ऐका. काशीत भागीरथीच्या तीरावर एक तेजस्वी ब्राह्मण आला आहे. स्नान करून, पद्मासन घालून बसलेली त्याची मूर्ती मोठी मनोवेधक दिसते. त्याच्या तोंडावर विद्येचे तेज झळकते आहे. आम्ही चौकशी केली, तेव्हा कळले की

स्वारी चांगली विद्वान, वादविवादपटू, पुराण, इतिहास सांगण्यात पटाईत अशी आहे. त्यांच्या संभाषणात भलतेच माधुर्य आहे. त्यांच्या बरोबरचा एक आश्रित सांगत होता की या थोर महात्म्यास एकवीरा देवीचा अनुग्रह झाला आहे. अशा महात्म्याच्या दर्शनाला मी निघालो आहे. आपण पण चला हवेतर !"



उभयता शास्त्री निघाले व इच्छित स्थळी पोहोचले. आणखी किती तरी क्षेत्रस्थ विद्वान मंडळीही तेथे जमलेली होती. नमस्कार-चमत्कार, क्षेमकुशल विचारणे झाल्यावर मंडळी दाटीवाटीने बसली. एक विद्वान म्हणाले, " महाराज, आपण दक्षिण देशातून आला आहात. दक्षिणेत तुळजाभवानी देवीच्या प्रसादाने ज्याला राज्य मिळाले आहे, ज्याने यवनांचा रणांगणावर व राजनीतीत पराभव केला आहे, जो प्रजा, गाई, ब्राह्मण,

देवस्थाने यांचे संरक्षण आपल्या सामर्थ्याने करीत आहे अशा शिवाजी राजाचे चरित्र आपण रचले आहे, असे आम्ही ऐकतो. ते कृपा करून आम्हांस सांगा. ”

ते भाषण ऐकताच मंद स्मित करीत परमानंद शांतपणे म्हणाले, “ खरे आहे आपले म्हणणे. मी शिवाजी महाराजांकडे गेलो असता विष्णूचा अंश असलेला तो राजा मला म्हणाला, ‘ मी आतापर्यंत जी भलीबुरी कृत्ये केली ती वर्णन करा ! वर्णनाला आरंभ माझे आजोबा मालोजी यांच्या कारकीर्दीपासून करा ! ’ राजांचे ते उद्‌गार ऐकून मी घरी आलो. महाभारताप्रमाणे मोठे चरित्र आपल्या हातून कसे पार पडेल या चिंतेत असतानाच मला दृष्टान्त झाला. एकवीरा देवी प्रसन्न होऊन तिने मला धीर दिला; स्फूर्ती दिली. तिच्या कृपाप्रसादाने धीर येऊन मोठ्या उत्साहाने मी हा इतिहास रचला ! हे शिवाजी राजांचे चरित्र महाभारताप्रमाणे आहे; तरी हे शिवभारत ऐका ! ” असे म्हणून त्या तेजस्वी विद्वानाने ‘ शिवभारत ’ हे शिवाजी महाराजांचे चरित्र काशी येथील पंडितांना सांगितले !

या ग्रंथातच ग्रंथकाराने आपले नाव ‘कवीन्द्र परमानंदभट्ट गोविंदनंदन’ असे ठिकठिकाणी सांगितले आहे. परमानंद आपणास ‘ निधीवासकर ’ किंवा ‘ निवासकर ’ असेही म्हणवितात. निधीवास किंवा निवास म्हणजे नगर जिल्ह्यातले प्रवरा नदीच्या काठावरील सध्याचे नेवासे. येथेच ज्ञानेश्वरांनी आपली ज्ञानेश्वरी सांगितली. तेथे बरीच विद्वान घराणी होती. त्यातील एक परमानंदांचे घराणे. त्यांचा जन्म कुठे आणि केव्हा झाला हे उपलब्ध नाही. त्यांचा विद्याभ्यास पैठण आणि काशी येथे झाला. प्रवासाने आणि अभ्यासाने त्यांनी विद्वत्ता मिळविली. पुराण सांगण्याचा व्यवसाय केला. शिवाजी महाराजांचा

उद्योग याच वेळी चालू होता. त्यांचे कार्य विलक्षण पराक्रमांनी भरलेले होते. शक्ती, युक्ती आणि राजकारणी डावपेच यांनी प्रत्यही नव्या घटना घडत होत्या. उभ्या महाराष्ट्रात त्याबद्दल कुतूहल होते. त्या कुतूहलानेच परमानंद महाराजांकडे आले. गुणी माणूसच दुसऱ्याचे गुण ओळखतो, या न्यायाने महाराजांनीही त्यांना आपल्याकडे ठेवून घेतले. काही वेळा कवीन्द्र फौजेबरोबर वावरले. त्यांचा महाराजांच्या सहकाऱ्यांशी परिचय झाला. शिवाजी महाराजांच्या राज्यातील प्रदेशही त्यांच्या परिचयाचा होता. या निसर्गरम्य प्रदेशांची सुरस वर्णने त्यांच्या काव्यात आहेत. परमानंद हे स्वतः शिवाजीभोवती वावरलेले असल्याने त्यांनी आपल्या ग्रंथात दिलेली माहिती बिनचूक दिलेली आहे.

परमानंदांनी लिहिलेल्या शिवभारताचे एकंदर बत्तीस अध्याय आहेत. त्यातील एकतीस अध्याय पूर्ण आहेत. बत्तिसावा अध्याय छोटा आहे. मात्र या बत्तीसाव्या अध्यायाच्या शेवटी ग्रंथसमाप्तीचे गमक असे श्लोक नाहीत. त्यावरून शिव-भारताचे आणखी अध्याय असावेत, असा विद्वानांचा कयास आहे. शिवाजी महाराजांच्या पश्चात मराठ्यांचे राज्य उखडून टाकण्यासाठी औरंगजेबाने मोठी खटपट केली. त्या आणीबाणीत उभा महाराष्ट्र भाजून निघाला. किल्ले, गावे, घरे यांच्या होळ्या झाल्या. त्यामुळे पोथ्या आणि कागदपत्रांचा नाश झाला ! पुढे इंग्रजांचे राज्य झाले. " इंग्रज आले आणि वतनी कागद गुप्त झाले!" ते आता थोर संशोधकांच्या अकटो विकट प्रयासाने हळूहळू बाहेर येऊ लागले आहेत. हे शिवभारत त्यांतील एक रत्न आहे. तूर्त तरी त्याचे बत्तीस अध्यायच उपलब्ध आहेत. या बत्तीस अध्यायांत ५२६२ श्लोक आहेत.

शिवभारतात मालोजी राजांच्या कारकीर्दीपासून आरंभ आहे. शहाजीचे पराक्रम, जिजाबाईचे लग्न यांची वर्णने त्यात आहेत. शिवाजी महाराजांच्या जन्माचे वर्णन यात आहे. महाराजांचे बालपण वर्णन करताना कवींद्रांच्या काव्याला भरते येते. शिवचरित्रातील मुख्यतः फत्तेखानाची स्वारी, अफजलखानाचा वध, पन्हाळगडचा वेढा, शाईस्तेखानाची स्वारी, उंबरखिडीचे युद्ध, त्यानंतर महाराजांनी कोकणात काढलेली मोहीम या प्रसंगांची वर्णने शिवभारतात आहेत. शृंगारपूरच्या सुर्व्यांवरील स्वारी हा उपलब्ध शिवभारतातील शेवटचा प्रसंग आहे.

शिवभारताची रचना मुख्यतः अनुष्टुप वृत्तात आहे. काही ठिकाणी मालिनी, शिखरिणी, वसंततिलका व इतर वृत्तेही योजलेली आहेत. सबंध शिवभारत शब्दालंकार व अर्थालंकार यांनी ओतप्रोत भरलेले आहे. वीर व रौद्र रसांची तर ठिकठिकाणी कारंजी थयथय नाचताना दिसतात.

शिवभारतात शिवाजी महाराजांच्या आयुष्यातील दोन प्रसंगांचे काळाचे उल्लेख आहेत. त्यातील पहिली मिती आहे शिवाजी महाराजांच्या जन्माची व दुसरी आहे अफजलखानाच्या वधाची. दोन्ही तिथी अगदी बिनचूक आहेत. शिवाजीमहाराजांच्या वर्णन केलेल्या प्रसंगाचा अनुक्रमही बिनचूक आहे. यामुळे शिवभारत विश्वासार्ह असेच आहे.

शिवभारतकार कवींद्र परमानंद हे शिवाजीराजांच्या बरोबर वावरलेले असल्याने त्यांनी महाराजांचे हुबेहुब वर्णन केले आहे. त्यांच्याच भाषेत ते ऐकू या.

" उत्तम कवच घातलेला शिवाजीराजा भोसला तुरा खोवलेल्या शुभ्र पगडीने व केशराचा शिडकावा मारलेल्या

अंगरख्याने फारच शोभत होता. त्या वज्रकाय पुरुषाला त्या कवचाची काय गरज ? एका हातात तरवार व दुसऱ्या हातात पट्टा धारण करणारा तो शिवाजी राजा नंदक खड्ग व कौमोदकी गदा धारण करणाऱ्या प्रत्यक्ष विष्णूप्रमाणे दिसत होता. मग गडाच्या कडेवरून सिंहाप्रमाणे बाहेर पडून झपझप पावले टाकीत अगदी निकट येऊन उभा राहिलेल्या आणि अंकुशाप्रमाणे सुंदर, भव्य व लांब अशा दाढीने भीषण दिसणाऱ्या धैर्यवान व धैर्यदृष्टी वीर शिवाजीस शत्रूने पाहिले.

( शिवभारत अध्याय २१, श्लोक १९ ते २३ )

शिवाजीची बाललीला, स्वरूपवर्णन, व्यवहारनिरीक्षण, लढाया, सैन्य यांची परमानंदांनी केलेली कितीतरी हुबेहुब वर्णने देता येतील. पण ती मुळातूनच वाचावयास हवीत. परमानंदांच्या नावावर इतरही चारपाच काव्ये मोडतात.

परमानंद शिवाजी महाराजांच्याबरोबर आग्रा येथे गेले होते. महाराज कैदेत पडल्यानंतर त्यांनी आपल्याजवळचा हत्ती, हत्तीण, घोडा, उत्तम कापड, सहस्र रुपये परमानंदांना दिले. बरेच कापडचोपड बैलावर लादून स्वामी दक्षिणेकडे येण्यास निघाले. महाराज आग्रा येथून निसटल्यावर त्यांचा शोध सर्वत्र सुरू झाला. हत्ती, उंट, कापडसामान यांनी लादलेल्या बैलांच्या तांड्यासह दक्षिणेकडे येणाऱ्या परमानंदांना मोगलांच्या अधिकाऱ्यांनी घाटात अडवून धरले.अधिकाऱ्यांना आपल्या सामानाची झडती घेऊ देऊ नका, अशी त्यांनी विनंती केल्यानंतर मिर्झा राजे जयसिंग यांच्या हुकमाने त्यांची सन्मानपूर्वक सुटका झाली.

परमानंद शेवटी कोकणात पोलादपूर येथे राहू लागले. तेथे महाराजांनी त्यांना मोठा वाडा बांधून दिला. इ. स. १६७३

मध्ये महाराजांनी आण्णाजी दत्तो यांच्या हस्ते पन्हाळा घेतला. पन्हाळा पाहण्यास रायगडाहून जात असता महाराज पोलादपूरला कवीन्द्र परमानंदाकडे गेले. तेथे त्यांनी स्वामींचे दर्शन घेऊन आशीर्वाद घेतला, असे वर्णन पर्णालपर्वतग्रहणाख्यान या ग्रंथात जयराम पिंडे या समकालीन कवीने केले आहे.

इ. सन १६४५ पासूनच शिवाजी महाराजांच्या पत्रावर

प्रतिपच्चंद्ररेखेववर्धिष्णुर्विश्ववंदिता ।
शाहसुनोः शिवस्यैषा मुद्रा भद्राय राजते ॥

ही मुद्रा असे. राज्याभिषेकापूर्वीपासून चालत आलेली ही मुद्रा बदलावी असे घाटत होते. त्या मुद्रेवर घालण्यासाठी परमानंदांनी एक सुंदर श्लोक तयार करून दिला होता. तो असा :


श्रीशिवरूपेणोर्वीमवतीर्णोऽयं स्वयंप्रभुविष्णुः ।
एषा तदीय मुद्रा भूवलयस्याऽभयप्रदा जयति ॥

पण या श्लोकाचा उपयोग केलेला दिसत नाही.

परमानंद राजकवीसारखे असावेत असे दिसते. त्यांच्या पश्चात त्यांचा मुलगा देवदत्त व नातू गोविंद यांनी संभाजी, राजाराम, शाहू, ताराबाई यांच्या स्तुतीपर कविता रचल्या आहेत. शिवाजी महाराजांचे अलौकिक चरित्र सुरस भाषेत लिहिल्यामुळे परमानंदांचे काव्य अमर झाले यात शंकाच नाही.

अनुक्रम ३०७५
विभाग
क्रमांक ३३९९
नों. दि.

## ५ : गागाभट्ट



गोदावरी तीरावरची पैठण नगरी ही एके काळी विद्वत्तेची मोठी पेठच होती. विद्याविभूषित अशी अनेक घराणी पैठणास नांदत होती. अध्ययन आणि अध्यापन यांचाच उद्योग त्या विद्वानांच्या घरांत नेहमी चाललेला असे. कित्येक ठिकाणचे विद्यार्थी पैठणास येत. या घरकुलातील विद्यापीठात अभ्यास करून पुनः ते आपआपल्या घरी जात. या विद्वान मंडळीत शेष आणि भट्ट ही घराणी आपल्या विद्वत्तेबद्दल खूपच प्रसिद्ध होती. भट्ट घराण्याला फार श्रेष्ठ परंपरा होती. ह्या घराण्यातील अनेक विद्वानांनी, वेदवाङ्मयाची खूप सेवा केली, गहन विषयावर ग्रंथरचना केली आणि अनेक विद्यार्थी तयार केले. अशा प्रकारे ज्ञानाचा विस्तार व प्रसार पैठणला पिढ्यान् पिढ्या चालला होता.

उत्तरेकडून मुसलमानांचे आक्रमण झाले. या आक्रमणामुळे देवगिरीच्या यादवांचे रामराज्य बुडाले. अस्मानी सुलतानी सुरू झाली. दडपशाहीचा वरवंटा जीवनाच्या सर्व बाबींवर फिरू लागला. विद्या बुडाली. आचारविचार बुडाले. पाठशाळा मोडल्या.

ग्रंथांच्या होळ्या झाल्या. सगळी वाताहात झाली. त्यात भट्ट घराण्यातील रामेश्वरभट्टांनी पैठण सोडले. संगमनेर, नगर, कोल्हापूर अशा अनेक ठिकाणी हिंडून शेवटी ते विजयनगरला गेले. विजयनगरचे प्रसिद्ध राजे कृष्णदेवराय यांच्या पदरी काही दिवस ते राहिले. तेथे मन न रमल्यामुळे रामेश्वरभट्ट उत्तरेस काशी क्षेत्री जाऊन स्थायीक झाले.

रामेश्वरभट्ट हे मीमांसा, व्याकरण, तर्क, वेदान्त या शास्त्रशाखांत पारंगत होते. त्यांनी 'रामकुतूहल' नावाचा काव्यग्रंथ लिहिला. हे रामेश्वरभट्ट गागाभट्टांचे निपणजोबा. त्यांना नारायणभट्ट, श्रीधर व माधव असे तीन विद्वान पुत्र होते. त्यांनी वडिलांची परंपरा पुढे चालविली. कित्येक नवे ग्रंथ रचले. बरेच शिष्य तयार केले. नारायणभट्टांनी उत्तरेकडील अनेक विद्वानांबरोबर वादविवाद केले व त्यांना वादविवादात पराजित केले. नारायणभट्टांच्या विद्वत्तेचा खूप बोलबाला झाला. अकबराचा मंत्री तोडरमल याच्याशी त्यांची मैत्री झाली. त्यांनी स्वतः बरेच ग्रंथ लिहिले. अनेकांच्याकडून ग्रंथ लिहवून घेतले. दुर्मिळ हस्तलिखितांचा त्यांनी मोठा संग्रहही केला.

काशी क्षेत्राबद्दल नारायणभट्टांना अतिशय प्रेम वाटे.

श्रिता वाराणशी तेन नगरी न गरीयसी !
यतोन्या नगरी हेमनगरीतिमुपेयुषी !

(ही वाराणशी नगरी सोन्याच्या मेरू पर्वताप्रमाणे शोभायमान दिसत आहे. या नगरीपेक्षा श्रेष्ठ अशी दुसरी नगरी नाही.) असा काशी क्षेत्राचा उल्लेख त्यांनी आपल्या 'त्रिस्थळी सेतु' या ग्रंथात केला आहे. काशीचे अधिदैवत काशी विश्वेश्वर.

□ □ □

मुसलमानांनी विश्वेश्वर मंदिराचा विध्वंस केला होता. नारायण-भट्टांनी बादशाहाची परवानगी मिळवून देवालय पुनः बांधले आणि त्यात विश्वेश्वराची स्थापना केली.

यामुळे भारतवर्षात सर्व ठिकाणची विद्वान मंडळी नारायण भट्टांना वैदिकधर्माचा पुरस्कर्ता समजत, त्यांना यथोचित मान देत. नारायणभट्टांना रामकृष्णभट्ट नावाचे चिरंजीव होते. रामकृष्णभट्टांचे तीन मुलगे होते. थोरला दिनकर ऊर्फ दिवाकर, मधले कमलाकर व धाकटे लक्ष्मणभट्ट. दिवाकरभट्टांचे पोटी पुत्ररत्न झाले. त्याचे नाव ठेवले होते विश्वेश्वरभट्ट. विश्वेश्वर-भट्टांना घरात लाडाने गागा अशी हाक मारीत. हेच नाव पुढे पुढे इतके रूढ झाले की विश्वेश्वरभट्ट हे 'गागाभट्ट' याच नावाने ओळखले जाऊ लागले.

गागाभट्टांनी लहानपणापासून कसोशीने अध्ययन केले. ते थोर विद्वान झाले. त्यांच्या विद्वत्तेची खूप प्रसिद्धी झाली. कुणी त्यांना पंडित म्हणत, तर कुणी वेदोनारायण म्हणून त्यांची स्तुती करीत. प्रकांडपंडित, वेदान्तसूर्य, थोर मीमांसक, वेदविद्या-कंठाभरण अशा अनेक विशेषणांनी त्यांची लोक स्तुती करीत. काशी क्षेत्रातच नव्हे तर भारतात सर्वत्र त्यांना थोर मान होता. गागाभट्ट विद्वान होते तसे ते विनम्रही होते. मोठेपणा मिळूनही अहंकाराचा वारा त्यांना लागला नाही. त्यांनी नम्रपणे आपले अध्ययन, अध्यापन आणि ग्रंथलेखन चालू ठेवले. धर्मशास्त्र आणि मीमांसाशास्त्र हे त्यांचे प्रमुख विषय. त्या विषयांवर त्यांनी अनेक ग्रंथ लिहिले. त्यांचे ग्रंथ विद्वानांच्या मान्यतेला उतरले होते. गागाभट्ट केवळ पढिक अरसिक नव्हते तर ते उत्तम संस्कृत

कवीही होते. त्यावेळी महाराष्ट्रात शिवसूर्य आपल्या पराक्रमाने स्वराज्य भूषवीत होता. तर तिकडे काशीत गागाभट्ट विद्वानांचे सम्राटच होऊन राहिले होते. महाराजांच्या पराक्रमाचे वृत्तान्त गागाभट्टांच्या कानांवर येत. ते ऐकून त्या वेदोनारायणास आनंदाचे भरते येई.त्यांचे चित्तास परम समाधान वाटे.काशी क्षेत्री दूरवर राहून, शिवाजी महाराजांचे पराक्रम ऐकून नुसते समाधान मानून राहण्यापेक्षा एकदा स्वतः जाऊनच तो पराक्रमी शिवसूर्य पाहावा, असा विचार गागाभट्टांनी ठरविला. इ. स. १६७२-७३ च्या सुमारास काशीक्षेत्रातले हे विद्वानांचे सम्राट, शिवाजी महाराजांच्या दर्शनासाठी स्वतः निघाले. ठिकठिकाणच्या विद्वानांच्या गाठीभेटी घेत घेत, शास्त्रचर्चा व निरूपणे करीत करीत गागाभट्ट नाशिक येथे पोहोचले. श्रीरामचंद्रांच्या निवासानें पावन झालेल्या गोदावरी तीरावर त्यांनी मुक्काम केला.

शिवाजी महाराजांना गागाभट्टांच्या आगमनाची बातमी समजली. त्यांना अत्यंत आनंद झाला. गागाभट्टांना सन्मानाने घेऊन येण्यासाठी महाराजांनी आपले राजोपाध्याय व कारकून यांना रवाना केले. त्यांच्याबरोबर भटजींच्या स्वागतासाठी लवाजमाही दिला. राजोपाध्यायांनी नाशिक येथे गागाभट्टांची भेट घेतली. त्यांचा आदरसत्कार केला. त्यांना घेऊन ते रायगडाकडे निघाले.

रायगडासन्निध भटजी आल्यावर शिवाजीमहाराज स्वतः आपल्या मंत्र्यांसह सामोरे गेले! त्यांनी मोठ्या प्रेमाने त्यांचे स्वागत केले. प्रतापशाली, वीरशिरोमणी शिवबांचा नम्रपणा पाहून भटजी थक्क झाले! त्यांचे मन आनंदाने उचंबळून आले. महाराज गागाभट्टांना घेऊन गडावर आले. तेथे त्यांच्या राहाण्याची आणि मुक्कामाची व्यवस्था त्यांनी करून दिली.

रायगडावरच्या मुक्कामात त्यांना अनेक गोष्टी पाहायला मिळाल्या. शिवबांचा लोकसंग्रह आणि वस्तुसंग्रह त्यांनी पाहिला. पराक्रमी, शूर सहकाऱ्यांच्या खटपटी त्यांना दिसल्या.फौजफाटा, हत्तीघोडे, राजव्यवस्थेचे अठरा कारखाने, भरलेला खजिना, सुखी आणि संतुष्ट प्रजा, न्यायी आणि दक्ष कारभारी या सर्व गोष्टी गागाभट्टांना दिसल्या.हे सर्व शिवाजी राजांनी आपल्या पराक्रमाने शून्यातून निर्माण केलेले होते. ते पाहून तर त्यांना शिवबाचे अतिशयच कौतुक वाटले. अखिल हिंदुस्थानात जे घडले नाही, ते येथे घडले होते. या महान कार्याचे मोल गागाभट्टांनी बरोबर ओळखिले.

त्यांच्या मनाला एक गोष्ट मात्र खटकली. इतके मोठे अलौकिक कार्य करणाऱ्या राजपुरुषाला अद्याप राज्याभिषेक झालेला नाही ! "मुसलमान बादशाह तक्ती बैसून, मस्तकावर छत्र धरवून, बादशाही करितात आणि शिवाजी राजे यांनी चार पादशाहघा आपल्या पराक्रमाने दबविल्या, ऐसे असता त्यास तक्त नाही," ही गोष्ट काही ठीक नाही, असे गागाभट्टांच्या मनाने घेतले. गागाभट्टांनी आपले विचार महाराजांपाशी बोलून दाखविले. राजाला राज्याभिषेक झाल्याशिवाय जगाची मान्यता नाही. राज्याभिषेक झाल्याखेरीज स्वतःच्या प्रजेलाही सार्वभौमत्वाचा साक्षात्कार होत नाही. राज्याभिषेकाशिवाय या महान कार्याची सांगता होणार नाही, हे त्यांनी महाराजांना पटवून दिले. तुम्ही सिंहासनावर बसावे, राज्याभिषेक करून घ्यावा, असे त्यांनी महाराजांना आग्रहाने सांगितले.

महाराजांनी आपले पदरचे मातबर लोक बोलावून आणून त्यांच्यापुढे गागाभट्टांचा राज्याभिषेकाचा विचार सांगितला.

सर्वांनाच तो पटला. सर्वांचा विचार पाहून स्वतःला राज्याभिषेक करून घेण्याचे शिवाजी महाराजांनी ठरविले.

हे एक महान कार्य होते. या कामाला मुळापासून सुरुवात करावयाची होती. त्यांत अनेक अडचणी होत्या. पहिली अडचण राजधानीची ! राज्य म्हटले की चांगली राजधानी हवी. राजधानीचे स्थळ सुंदर हवे. दुर्गम हवे! रायगडाची निवड राजधानी म्हणून झाली. कारण "रायगड बहुत चखोट, चौतकी गडाचे कडे तासिल्याप्रमाणे, पर्जन्यकाळी कडियावर गवत उगवत नाही. महाराज रायगडावर बहुत संतुष्ट झाले व बोलले, तक्तास जागा हाच गड करावा ! " गडावर अठरा कारखान्यांच्या जागा होत्याच. त्यातच भर म्हणून राज्याभिषेकासाठी सभामंदिर बांधण्याची महाराजांनी आज्ञा केली. गडावरील जगदीश्वराचे मंदिरही बांधायला सांगितले.

महाराजांच्या राज्याभिषेक समारंभाची तुलना कशाशी करता येणार ? तो महाराष्ट्रभूमीच्या स्वयंवराचा सोहळाच म्हणाना. समारंभासाठी किती तरी लोक येणार. देशातले आणि देशोदेशींचेही. स्वजन आणि परजन. सर्वांच्या राहाण्या-उतरण्याची, आगतस्वागताची तयारी सुरू झाली. प्रत्यक्ष समारंभासाठी हत्ती, घोडे, अंबाऱ्या, अब्दागिऱ्या, पालख्या, डेरे, राहुट्या, शामियाने; नाना तऱ्हेचे भरपूर धनधान्य, तेले, धार्मिक विधीसाठी लागणारे तऱ्हेतऱ्हेचे साहित्य, गाद्या, लोड, पडदे, कपडे, अलंकार, वस्त्रे, पात्रे अशा हजारो तऱ्हेच्या सामानाची जुळणी करण्यात आली. निरनिराळ्या कामांवर निरनिराळ्या कारकुनांच्या नेमणुका करण्यात आल्या. नेहमीची कामे सांभाळून मंडळी हौसेने कंबर कसून कामाला लागली. कशाचीही

कमतरता राहू नये म्हणून तपशीलवार याद्या करून तयारी होऊ लागली.

शिवाजी महाराजांचे चिटणीस बाळाजी आवजी यांनी राजस्थानात बारीक शोध करून महाराज हे प्रसिद्ध शिसोदे वंशातील असून त्यांची कुळी अस्सल क्षत्रियाची आहे, असे सिद्ध केले. ते क्षत्रिय असल्याने त्यांना मौंजीबंधनाचा, गायत्री मंत्राचा आणि राज्याभिषेकाचा पूर्ण अधिकार आहे, ही गोष्ट सर्वांना मान्य करावी लागली.

गागाभट्टांनीच राज्याभिषेकाची कल्पना पुढे मांडलेली. तेव्हा या समारंभाचे मुख्य पुरोहित म्हणून शिवाजीराजांनी त्यांचीच योजना केली. राज्याभिषेकाचा सोहळा कित्येक वर्षांत महाराष्ट्रात घडलेला नव्हता. त्यामुळे त्याचा विधी लुप्त झाला होता. गागाभट्टांनी शास्त्राधार शोधून मुद्दाम ' राज्याभिषेक प्रयोग ' तयार केला व त्या प्रयोगाच्या आधारे सर्व विधी पार करण्याचे ठरले.

राजेरजवाडे, बादशाहा, परदेशी वकील, व्यापारी, नातेवाईक, मित्रमंडळ, संतमहंत या सर्वांना समारंभाची आमंत्रणे गेली. आमंत्रणांप्रमाणे आलेल्या मंडळींनी गड गजबजून गेला. ध्वज, पताका, तोरणे यांनी आगळी शोभा आली. सर्वत्र रांगोळ्या आणि स्वस्तिके काढण्यात आली. नगारे, चौघडे, शिंगे, सनया या वाद्यांनी गड दुमदुमून गेला. घोडे, हत्ती नटूनथटून समारंभाची शोभा वाढवू लागले.

उत्साहाची धावपळ सुरू झाली. आनंद ओसंडू लागला. वेदोक्त संस्कारांनी समारंभाला सुरुवात झाली. प्रथम गणेशपूजन होऊन निरनिराळ्या देवतांची प्रतिष्ठापना झाली. कुलधर्म,

कुलाचार झाला. पुण्याहवाचन झाले. ज्येष्ठ शुद्ध चतुर्थी दिनांक २९ मे १६७४ या शुभमुहूर्तावर शिवाजी राजांची मुंज करण्यात आली. आधी लग्न मग मुंज ! मुंजीनंतर महाराजांचे त्यांच्या राण्यांशी समंत्रक विवाह करण्यात आले. होमहवने, शांत्या झाल्या. इडापिडा टाळण्यासाठी शिवाजी महाराजांनी स्वत:ची सुवर्णतुला केली. सुवर्णाप्रमाणेच चांदी, तांबे, जस्त, कथील, शिसे, लोखंड, ताग, कापूर, मीठ, खिळे, जायपत्री, मसाले, लोणी, साखर, कित्येक प्रकारची फळे, खाद्ये इत्यादी नाना तऱ्हेच्या वस्तूंच्या तुला करून त्या सर्व पदार्थांचा दानधर्म करण्यात आला.

शेवटी राज्याभिषेकाचा ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशीचा दिवस आला. या दिवशी तीन घटिका रात्र उरली असता राज्याभिषेकाचा विधी सुरू झाला. आरंभीचे सर्व संस्कार होऊन गागाभट्टांच्या सांगण्याप्रमाणे महाराज सोन्याच्या चौरंगावर बसले. त्यांच्या शेजारी सोयराबाई आणि युवराज संभाजीराजे बसले. चौरंगाभोवती मंत्री निरनिराळ्या पदार्थांचे कलश घेऊन उभे राहिले. मोरोपंत पिंगळे यांच्या हातांत तुपाचा सुवर्ण कलश होता. ते पूर्व दिशेला उभे होते. हंबीरराव मोहिते यांच्या हातांत दुधाचा रौप्य कलश होता. रामचंद्रपंत हातांत दह्याचा ताम्रकलश घेऊन पश्चिम दिशेला उभे होते. पंडितराव यांच्याजवळ गंगातीर्थ, समुद्रतीर्थ यांचे कलश भरून ठेवलेले होते. मोर्चेल, पंखा व छत्र धरून काही अधिकारी उभे होते. सभोवताली मंडळी समारंभ डोळे भरून पाहात होती. गागाभट्टांनी उच्चस्वरांनी मंत्र म्हटले. इतर ब्रह्मवृंदांनी त्याला साथ दिली. मंत्रघोषात पंचामृताचा अभिषेक झाला. उष्णोदक स्नान झाले. मग सुवासिनींनी पंचारत्यांनी शिवाजी महाराजांना ओवाळले. नंतर महाराजांनी वस्त्रे, अलंकार घातले. त्यांनी शस्त्रपूजा केली.

वडिलधारी मंडळी व मातोश्री यांना नमस्कार करून त्यांचे आशीर्वाद घेतले. भालदार चोपदार यांच्या ललकाऱ्यांच्या



निनादात मंत्री आणि चिटणीस यांच्यासह महाराजांनी सभागृहात प्रवेश केला. तिथे जमलेल्या मंडळींनी महाराजांचा जयजयकार केला. सभागृहात सिंहासन सजवून ठेवले होते. सिंहासनाच्या आजूबाजूला राजचिन्हे होती. न्यायाचे प्रतीक म्हणून तराजू होता. सुवर्णमत्स्य होते. अश्वपुच्छे होती !

महाराज सिंहासनापुढे आले. सिंहासनाला वंदन करून पूर्वेकडे तोंड करून मंत्रांच्या घोषात ते सिंहासनावर बसले. नाना

वाद्यांचा गजर झाला. तोफांचे आवाज झाले. दुंदुभीचे आवाज झाले. सुवासिनींनी आणि कुमारिकांनी महाराजांना कुंकुमतिलक लावून ओवाळले. विद्वानांनी त्यांना आशीर्वाद दिले. गागाभट्टांनी शिवाजी महाराजांच्या डोक्यावर छत्र धरले! "क्षत्रिय कुलवतंस छत्रपती शिवाजी महाराज" अशी त्यांनी घोषणा केली. शालिवाहन शके १५९६ आनंदनाम संवत्सरी ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशीला महाराज सिंहासनावर बसले. छत्रपती झाले. कित्येक वर्षांनंतर झालेला अभूतपूर्व सोहळा पाहून लोकांची मने हरखून गेली.


नंतर मंत्र्यांनी, प्रधानांनी, परदेशी पाहुण्यांनी महाराजांना मुजरे केले, अहेर केले. महाराजांनीही सर्वांना मानाची वस्त्रे आणि देणग्या दिल्या. इंग्रजांतर्फे वकील हेन्री ऑक्झिडेन याने सातशे रुपयांचा नजराणा, मौल्यवान अंगठी, छानदार खुर्ची व इतर वस्तू महाराजांना नजर केल्या. महाराजांनी त्याला जवळ बोलावून त्याची चौकशी केली. हा कार्यक्रम आटोपून महाराज मिरवणुकीने देवदर्शनासाठी जाऊन आले. त्यांच्याबरोबर स्वार, पायदळ आणि इतर लवाजमा होता. जगदीश्वराच्या प्रासादाकडे मिरवणूक जात असताना रस्त्याच्या कडेला जमलेल्या प्रेक्षकांनी महाराजांच्यावर सुवर्ण आणि रौप्यपुष्पांची वृष्टी केली व त्यांच्या नावाचा जयजयकार केला. या समारंभासाठी महाराजांनी पाच कोटी रुपये खर्च केला.

या समारंभाचे योजक व अध्वर्यू गागाभट्ट यांचा महाराजांनी भरपूर द्रव्य देऊन सत्कार केला. राज्याभिषेक संस्कार व राजांचा व्रतबंध वैदिक पद्धतीने करून लुप्त झालेल्या संस्कारांचे मोठ्या धैर्याने पुनरुज्जीवन करून गागाभट्टांनी नवी प्रथा पाडली. ही त्यांची कामगिरी अलौकिक अशी आहे.

राज्याभिषेकानंतर गागाभट्ट बरेच दिवस रायगडावर होते. त्यांनी 'कायस्थप्रदीप' हा ग्रंथ लिहिला. छत्रपतींच्या आज्ञेने त्यांनी पूर्वमीमांसेच्या बारा अध्यायांवर 'शिवार्कोदय' हा ग्रंथ लिहिला. अष्टप्रधान, त्यांची संस्कृत नावे व अधिकार त्यांनीच सुचविले. जातीजातीमधील वाद सोडविण्यास त्यांनी महाराजांना मदत केली. गागाभट्टांच्या दूरदृष्टीमुळेच राज्यारोहणाचा अपूर्व सोहळा घडला. या त्यांच्या द्रष्टेपणाला इतिहासकार धन्यवादच देतील.

गागाभट्टांनी 'शिवराजप्रशस्ती' नावाचा ग्रंथ लिहून महाराजांच्या कार्याचे मूल्यमापन केले आहे. 'यः क्षात्रधर्मस्य नवावतारः'! या त्यांनी लिहिलेल्या एका वाक्यातच महाराजांच्या सर्व कार्याचे सार आले आहे.

अनुक्रम ३०९५
विभाग बाल वाङ्मय
३३११
नों. दि. २५।१२।६५
ग्रंथालय



# ६. आक्कण्णा आणि मादण्णा

"मारो ! काटो ! बहमन्कु काटो ! मारो !" भागानगरच्या राजरस्त्यावर एकच धांदल उडाली. गडबड झाली. रस्त्यावरचे लोक सैरावैरा पळू लागले. दुकाने, घरे पटापट बंद होऊ लागली. नेमके काय होते आहे, हे कळण्याच्या आधीच बादशाही वजीर 'सूर्यप्रकाशराव' मादण्णा आणि त्यांचे बंधू आक्कण्णा यांचा खून झाला ! त्यांची शिरे मारेकऱ्यांनी धडापासून क्रूरपणे तोडली. धडांची रस्त्यावरून फरपटत विटंबना केली.

वजिरांचा खून ही बाब बादशाही अमलात नवी नव्हती; पण खुनाची बातमी समजताच बादशहा अबुलहसन कुतुबशाह ऊर्फ तानाशाहा यांना अतोनात दुःख झाले. त्यांनी चौकशी करता बातमी समजली की, मोगलांचे हस्तक यल्लमतराव यांनी असंतुष्ट बेगमांशी संगनमत करून आक्कण्णा आणि मादण्णा दरबारचे काम संपवून घरी परत जात असता दगा करून भर दुपारी बारा वाजता राजरस्त्यावर दोघांना ठार केले. तेथून बेभान झालेल्या मारेकऱ्यांनी वजिरांच्या हवेलीवर हल्ला चढविला.

तिथे असणारी त्यांची मुले, माणसे ठार केली ! त्यांचे मोठे थोरले घर लुटून त्याला आग लावून दिली. या धांदलीत कितीतरी ब्राह्मण ठार झाले ! मारेकऱ्यांच्या मोगलधार्जिण्या मालकाने वजिरांची शिरे औरंगजेब बादशहाला नजर केली ! ती इ. स. १६८६ च्या मार्चची सोळा तारीख होती. औरंगजेबाने शिरांच्याकडे पाहून विकट हास्य केले. " अभी हैद्राबादपर कब्जा करना बिल्कुल मुश्कील नही ! " असे म्हणून शिरे आणणाऱ्यांना त्यांनी इनाम दिले, निरोप दिला. औरंगजेबासारख्या जबरदस्त बादशाहासही ज्यांच्या मृत्यूने हायसे वाटले, त्या आक्कणा-मादण्णांची चरित्रेही मोठी विलक्षण आहेत.

हैद्राबाद राज्यातील वरंगळ प्रांतात हनमकोंडा हे एक गाव होते. त्या गावी भानूपंत नावाचे ब्राह्मण गृहस्थ राहात असत. ते अत्यंत धार्मिक वृत्तीचे होते. हिशोबी कामात व मुलकी कारभारातही ते चांगले जाणकार होते. प्रथम त्यांच्याकडे फक्त महसूलाच्या वसूलीचें काम असे. पुढे ते इतर कारभारही पाहू लागले. सचोटी आणि हुषारी याबद्दल त्यांचा फार लौकिक होता. त्यांच्या पत्नीचे नाव होते भागम्मा. भागम्मांच्या माहेरची माणसेही घरंदाज होती.

भानूपंतांना चार मुलगे आणि एक मुलगी झाली. मुलांची नावे होती आक्कण्णा, मादण्णा, विसण्णा आणि मृत्युंजय. त्यांनी आपली मुलगीही चांगल्या घरी दिली. भानूपंतांनी मुलांच्या शिक्षणाकडे अतिशय लक्ष दिले. लिहिणे, वाचणे, हिशोब यांच्या शिक्षणाबरोबरच त्यांनी मुलांना इतर भाषा शिकविल्या. आक्कण्णा व मादण्णांना संस्कृत, हिंदी, फारशी, तेलगू आणि मराठी भाषा येत असत. मुलांच्या आईनें मुलांच्यावर

धार्मिक संस्कारांचा ठसा उत्तम बठविला. त्यामुळे मुले धार्मिक आणि परोपकारी निघाली. भानूपंतांनी त्यांच्या मुंजी केल्या, त्या-वेळेच्या रिवाजाप्रमाणे योग्य कन्या पाहून त्यांची लग्नेही केली.

प्रथम प्रथम आक्कण्णा आणि मादण्णा घरीच वडिलांना कामात मदत करीत. मुलांची वये वाढली. घरचे काम त्यांच्या वाढत्या कर्तबगारीला अपुरे पडू लागले. मग आई-वडिलांचा निरोप घेऊन दोघे भाऊ नोकरीच्या शोधार्थ भागानगरला गेले.

भागानगर त्या वेळी कुतुबशाहीच्या राजधानीचे शहर होते. अमीर उमराव, सरदार यांची तिथे मोठी वस्ती होती. व्यापाऱ्यांच्या मोठमोठ्या पेठा होत्या. तिथे मोठमोठ्या उलाढाली होत. कर्तबगार कामकऱ्यांना तिथे कामाला तोटा नव्हता. दोघे भाऊ भागानगरला आले. तेथील मिरजाफर या उमरावाकडे पोतदार किंवा सराफ म्हणून नोकरीस राहिले.

त्यांच्या मालकाचे कुतुबशाहाच्या दरबारी जाणे-येणे असे. कुतुबशाहाच्या मुलीचे लग्न जमविण्यात त्यांनी मोठा भाग घेतला. ही नाजुक कामगिरी त्यांच्या पदरच्या आकण्णा मादण्णांनी मालकाच्या इच्छेप्रमाणे पार पाडली. मुलीचे लग्न अबुलहसन यांच्याशी झाले. या प्रसंगामुळे अबुलहसनशी त्यांची मैत्री झाली. हाच अबुलहसन पुढे बादशाहा झाला. सरदार मीरजाफर इसवी सन १६६३ च्या सुमारास वारले. त्यांचा कारभार सय्यद मुझाफर यांच्याकडे आला. आक्कण्णा आणि मादण्णा नव्या मालकाकडे काम करू लागले. तिथे यांचा हिशोबीपणा आणि वाकबगारी पाहून त्यांना मालकाकडून भराभर बढत्या मिळाल्या. शेवटी तर ते सय्यद मुझाफर यांचे मुख्य पेशकार किंवा सेक्रेटरी झाले.

अबुलहसन हे कुतुबशाही तक्तावर बसल्यावर सय्यद मुझाफर मुख्य वझीर झाले. आक्कण्णा-मादण्णांना आणखी बढती

मिळाली. ते बादशाही कारभारी झाले. आक्कण्णांना राज्याची सबनिशी मिळाली. मादण्णा मुजुमदारीचा–फडणिशीचा व्यवहार सांभाळू लागले.

थोड्याच दिवसांत वझीर मुझाफरखान डोईजड झाले. बादशाहावर आपण खूप उपकार केलेले आहेत, शिवाय त्यांना कारभाराची अक्कलही कमी आहे, असे त्यांना वाटे. बादशाहाला त्यांचा जाच वाटू लागला. त्यांनी आक्कण्णा-मादण्णांना विश्वासात घेतले. त्यांची संमती मिळताच इ. स. १६७५ च्या सुमारास वझिराला नोकरीवरून दूर केले. राज्याचा सर्व कारभार मादाण्णांकडे आला. बादशाहाने त्याला 'सूर्यप्रकाशराव' असा किताब दिला. आक्कण्णा भावाला मदत करू लागले.

दोघा भावांनी भागानगरला मोठा वाडा बांधला. ते ऐश्वर्याने राहू लागले. पण ऐष-आरामात दंग न होता मोठ्या हुषारीने ते कारभार पाहू लागले.त्या दिवसात विश्वासू,भरवशाचे कामदार सरकारी कामात दुर्मिळच असत. दोघा भावांनी आपल्या जवळच्या कर्तबगार नातेवाइकांना सरकारी कारभारात घेतले. धाकटा भाऊ विसण्णा बादशाही सेनेचा बक्षी झाला. मृत्युंजयही मुलकी कारभार पाहू लागला. भाचा यंगण्णा शूर होता. तो दुय्यम सेनापती झाला. दुसरा भाचा सुभेदार झाला. पुतण्या लिंगाप्पा कर्नाटकचा सुभेदार झाला. अनेक हिंदू ब्राह्मण मंडळीही कारभारात शिरली. मंडळी नातेवाईक होती, तशी कर्तबगारही होती. त्यामुळे कारभाराची घडी चांगली बसली. पुंड पाळेगारांचा बंदोबस्त झाला. राज्याचा खजिना तुडुंब भरला. तलावांची, कालव्यांची कामे झाल्याने सुबत्ता आली. जुलमी कारभार बंद झाल्याने प्रजा आनंदात नांदू लागली. आपली निवड बरोबर

ठरल्यामुळे बादशाहा खूष झाले. आकण्णा-मादण्णांच्यावर त्याचा पूर्ण विश्वास असे. राज्याचा बंदोबस्त आणि कारभार नीटनेटका करीत असताना परराष्ट्र-संबंधाकडे त्यांनी मुळीच दुर्लक्ष केले नाही.

विजापूरच्या आदिलशाहीत उत्तरेकडून आलेल्या पठाणांचा वरचष्मा असे. मोगल बादशाहा तर दक्षिणेकडची तमाम राज्ये बुडविण्यास टपलेले होते. तेव्हा या दोघांचे शत्रू जे छत्रपती शिवाजी महाराज यांच्याशी त्यांनी संधान बांधले. शिवाजी महाराजांचे वकील प्रल्हाद निराजी यांच्या मार्फत महाराजांशी संबंध ठेवून त्यांना भागानगरच्या भेटीचे आमंत्रण त्यांनी बादशाहांच्या हस्ते देवविले.

बादशाहाचे खास दस्तखत मुबारक पंजाचे फर्मान शिवाजी महाराजांना आले.महाराज दक्षिणेकडे निघाले. आपल्या विजयी फौजेसह मोठ्या समारंभाने ते भागानगरला गेले. बादशाहांनी त्यांचा आदरसत्कार केला. स्नेहपूर्ण वातावरणांत दोघांच्या भेटी झाल्या. बादशाहांनी तहाची बोलणी ठरविण्याचे काम मुख्य वजीर मादण्णा आणि आक्कण्णा यांच्यावर सोपविले. त्यांनी महाराजांशी वाटाघाटी केल्या. "दक्षिणची बादशाही दक्षिणीयांचे हाती राहील," ते करावयाचे उभयतांनी ठरविले. पंतांनी बादशाहाकडून महाराजांना साडेचार लाख रुपये देवविले. कर्नाटकच्या स्वारीत कुतुबशाही फौज महाराजांच्या फौजेत सामील झाली. बादशाहांनी मराठी सरदारांना आपल्या पदरी ठेवण्याचे कबूल केले. मोठ्या दूरदर्शीपणे महाराज आणि आक्कण्णा-मादण्णा यांनी दक्षिणीयांची एकजूट केली. शत्रूचा शत्रू तो आपला मित्र, हे सूत्र उभयतांनी मान्य केले.




आक्कण्णा आणि मादण्णा या पंत बंधूंनी छत्रपतींना आपल्या घरी मेजवानीस बोलावले. त्यांच्या मातोश्री भागाम्मा यांनी मोठ्या प्रेमाने छत्रपतींना जेवायला वाढून त्यांचे कौतुक केले. महाराजांनीही पंतांची खूप वाखाणणी केली. भागानगरची कामगिरी उरकून महाराज दक्षिणेस गेले.

आक्कण्णा-मादण्णांच्या या शिवाजीप्रेमामुळे अनेकजण त्यांच्यावर जळू लागले. या द्वेषाचा शेवट उभयता कारभाऱ्यांचा खून होण्यात झाला. आक्कण्णा-मादण्णांच्या पश्चात् कुतुबशाहीचा

थोड्याच दिवसांत बोजवारा उडाला. औरंगजेबाने भागानगराचे राज्य काबीज केले.

आक्कण्णा-मादण्णांना पंचाहत्तर हजार होनांची मोठी तैनात होती. त्यांच्या पदरी चांगली वीस हजार फौज होती. दोघांची वत्ती धार्मिक होती. त्यांनी खूप दानधर्म केला. काशीरामेश्वर येथे सदावर्ते, अन्नछत्रे सुरू केली. त्यांनी अनेक तलाव आणि देवळे बांधली.

दगाबाजीने कर्तबगार आक्कण्णा-मादण्णांचा खून न होता तर दक्षिणेची राज्ये बुडविण्यास औरंजेबाला आणखी कष्ट करावे लागले असते. पण 'काला'ची योजनाच वेगळी होती, त्याला इलाज काय ?



# ७: नागोजी जेधे

शिवाजी राजांना प्रथमपासून मदत करणारांमध्ये मावळातील कारीचे कान्होजी जेधे हे प्रमुख देशमुख होते. "अंगद-हनुमान रघुनाथाला, तैसे जेधे-बांदल शिवाजीला!" असे पोवाडेकारांनी म्हटले आहे. कान्होजीच्या स्वतःच्या उदाहरणामुळे आणि सल्ल्यामुळे मावळातील किती तरी देशमुख शिवाजीच्या पाठीशी उभे राहिले.

कान्होजी, त्यांची मुले, नातवंडे सर्वांनी शिवाजीची सेवा मनोभावे केली. जेध्यांची तरवार तिखट! या गुणामुळे महत्त्वाच्या सर्व स्वाऱ्यांमध्ये जेध्यांपैकी कुणी तरी हजर असावयाचेच. नागोजी जेधे हा सर्जेराव जेध्यांचा मुलगा आणि कान्होजी जेध्यांचा नातू. वडिलांचे आणि आजोबांचे गुण त्यात पुरेपूर उतरले होते. "शुद्ध बीजापोटी, फळे रसाळ गोमटी!"

लढाईचा प्रत्यक्ष अनुभव मिळण्यासाठी नागोजी आपल्या वडिलांच्या बरोबर स्वारीवर जात. त्यात त्यांना चांगला अनुभव मिळे. ते महाराजांच्या फौजेतले शिपाईगडी बनले.

"सैनिक-शिपाई जन्मावे लागतात," असे म्हणतात. ते खरे खोटे कसेही असो, पण शिपाई तयार करावे लागतात, हे मात्र खरे. शिपाई हत्यार चालविण्यात तरबेज तर हवाच, पण तो निष्ठावानही हवा. महाराजांनी सैनिकांत अशी निष्ठा निर्माण केली की, लढताना हात तुटेल; पण हातातील तरवार किंवा पट्टा सुटणार नाही. प्रसंगी मुंडीही उडेल, पण धड मोर्चा सोडणार नाही.अशा अनेक निष्ठावान सैनिकांपैकी नागोजी जेधे एक होते!

तसे नागोजीचे वय फारच लहान; म्हणजे असेल फार तर अठरा वीस वर्षांचे! पण निष्ठा दांडगी. लढाईवर जाण्याची हौसही दांडगी! स्वारीची ललकारी झाली की, मंडळी हजर.

इसवी सन १६७६ ऑक्टोबरच्या ६ तारखेस विजयादशमी होती. या विजयादशमीला महाराजांनी दक्षिण दिग्विजयासाठी प्रस्थान ठेवले. स्वराज्याचा कारभार मोरोपंतांच्यावर सोपवून बरोबर सुमारे वीस-पंचवीस हजार फौज घेऊन महाराज दक्षिणेस भागानगराकडे निघाले. महाराजांच्या फौजेत किती तरी खासे सरदार-शिलेदार होते. सूर्याजी मालुसरे, नेताजी पालकर, येसाजी कंक, हंबीरराव मोहिते, सोनाजी नाईक, धनाजी जाधवराव, कान्होजी जेध्यांचे पुत्र सर्जेराव जेधे आणि नागोजी जेधे. हे सारे होते. स्वारीचा थाट काही औरच होता. निशाण नाचवीत, नौबती वाजवीत महाराजांची फौज दक्षिण दिग्विजयास निघाली. फौजेने वाटेतील प्रजेला काडीमात्र त्रास किंवा तोशीस दिली नाही! फौजेचे वागणे असे होते की, वाटेतील प्रजेला वाटावे हेच आपले सच्चे मित्र!

असे वाटावयास कारणही जबरदस्त होते. कर्नाटकातील या मुलुखावर विजापूरच्या अदिलशाहीचा अंमल बरीच वर्षे होता. मुसलमानी राजांचा किंवा त्यांच्या सुभेदारांचा अंमल म्हणजे प्रजेला जाचच! या जाचाने प्रजा कंटाळून गेली होती.

कृष्णा आणि तुंगभद्रा नद्यांच्या मधला प्रदेश सुपीक, समृद्ध! या प्रदेशात कोप्पळचे त्या वेळचे प्रसिद्ध ठाणे होते. ठाण्यावर विजापूरच्या अदिलशाहीचे दोन जबरदस्त अंमलदार होते. एकाचे नाव होते हुसेनखान मियाना आणि दुसऱ्याचे नाव होत अब्दुर्रहीमखान मियाना. हे दोघे जण भाऊ भाऊ होते. जसे अहिरावण-महिरावणच! त्यांचा कारभार क्रूरपणाने चाले. प्रजेला ते पिळून काढीत. मुसलमानांशिवाय इतरांना ते अतिशय क्रूरपणे वागवीत. त्यांच्या जुलमी कारभाराने प्रजा कंटाळली होती. पण कंटाळून किंवा हैराण होऊन काहीच उपाय नव्हता. कारण प्रजेचा वाली कोणी नव्हता. बिचारे सारे निमूटपणे सहन करीत होते.

शिवाजी राजे भागानगरकडे जात आहेत, ही बातमी कोप्पळ प्रांतात पसरली. शिवाजी महाराजांच्या निरनिराळ्या पराक्रमाच्या गोष्टी, न्यायाने कारभार करण्याच्या वार्ता सुगंधाप्रमाणे सर्वत्र पसरल्या. त्या ऐकून तेथील त्रासलेल्या प्रजेला मनातून फार बरे वाटले. यामधील काही मंडळी खाजगी विचार करू लागली. विचार करून काही धाडसी मंडळींनी निश्चयच केला, की काहीही होवो–आपल्या दुःखाची कहाणी शिवाजी-राजांना ऐकवावयाची! त्यांच्या मदतीने जुलमी राज्यकर्त्यांच्या तडाख्यातून आपली सुटका करून घ्यायची! मनाचा हिय्या करून काही मंडळी महाराजांच्या छावणीत दाखल झाली!

महाराजांनी त्यांच्यावरच्या जुलमाची कहाणी ऐकून घेतली. त्यांचे मन तेथील भयंकर जुलूम ऐकून हेलावले. त्यांनी कोप्पळच्या मंडळींचे सांत्वन केले. त्यांची नीटनेटकी व्यवस्था करण्यास कारभाऱ्यांना सांगितले. मंडळींची मने आनंदाने फुलली.

इकडे महाराजांनी सेनापती हंबीरराव मोहिते यांना बोलविले व त्यांना फौज घेऊन कोप्पळची मुक्तता करण्याची कामगिरी सांगितली. महाराजांचा हुकूम होताच मराठी फौज तयार झाली. सेनापतीचा हुकूम होताच सेनेचे कूच सुरू झाले. कोप्पळच्या दिशेने घोडदळ दौडू लागले. फौजेत कारीचे सर्जेराव जेधे आपल्या पथकासह होते. त्यांचा तरुण मुलगा नागोजी जेधे हाही होताच. तरुण धनाजी जाधव हेही होते.

आपल्या विरुद्धचे गाऱ्हाणे शिवाजीकडे काही मंडळी घेऊन गेली आहेत, हे ऐकून मियाना बंधू चिडून गेले. गाऱ्हाणे करणाऱ्या मंडळींच्या घरादारावर चौक्या बसल्या. ध[illegible]टशा आणि मारपीट सुरू झाली. मियाना बंधूंनी शिवाजीरा[illegible]कडून येणाऱ्या फौजेबद्दल माहिती नीटनेटकी मिळविली. त्या माहितीवरून त्यांना कळून आले की, मराठ्यांची फौज थोडी आहे. त्यामुळे त्या दोघांना फार आनंद झाला. आपल्या फौजेची त्यांनी तयारी केली. मराठ्यांची फौज चिरडून टाकू, असा निश्चय करून हुसेनखान झपाट्याने निघाला. शत्रूला म्हणजे मराठ्यांना रस्त्यातच गाठून त्यांची कत्तल करावी, असा त्याचा विचार होता. त्याच्या हालचाली नेटाने आणि वेगाने चालल्या होत्या.

हंबीरराव मोहिते आपल्या फौजेसह येलबुर्ग्याजवळ पोहोचले होते. स्वार विश्रांतीसाठी थांबले होते. स्वयंपाक तयार

होत होता. तोच गडबड उडाली. दूरवर धुळीचे लोट आभाळात उडालेले दिसत होते. "गनीम आला! गनीम आला!" अशी आवई आली! स्वारांनी माना उंचावून, लांबवर पाहिले. बरीच मोठी फौज आभाळातील पावसाळी ढगांप्रमाणे हालत होती! ती पाहून सामान्य सैनिकांची छातीच धडकली असती! शिवाय हंबीररावाबरोबर फौजही थोडी होती. पण कोणी भ्याले नाही, की घाबरले नाही. स्वार तयार झाले! सेनापतींनी ठरविले की शत्रूने आपणास गाठण्याचे आत आपणच त्याला गाठून आपला मराठी हिसका दाखवू या! त्यांनी बाजू वाटून दिल्या. इशारा झाला. त्या इशाऱ्याबरोबर खानाच्या फौजेवर मराठे तुटून पडले. "हर हर महादेव! हर हर महादेव!" अशी प्रचंड गर्जना करीत मराठे स्वार खानाच्या फौजेत कत्तल करीतच घुसले. तलवारींचे पट्टे सपासप चालले! शाळू कापावा तशी शत्रूची कत्तल मराठे करू लागले. त्या भयंकर कापाकापीने शत्रूची फौज घाबरून पळू लागली. लांडग्यांच्या तुकडीने मेंढराच्या मोठ्या कळपावर तुटून पडून त्यांचा फन्ना उडवावा, अशी स्थिती झाली. मराठे आटोपत नाहीत, याबद्दल हुसेनखानाची खात्री झाली. तो भीतीने घाबरला. फौज सोडून मागे हटण्याचे त्याच्या मनाने घेतले. तो हत्तीवर होता. माहूताला त्याने हत्ती लढाईच्या गर्दीतून बाहेर काढायला सांगितले. माहुताने कसाबसा हत्ती बाहेर काढला. हुसेनखान फौज सोडून रणांगण सोडून पळत सुटला. त्याच्या फौजेची दाणादाण झाली. (जानेवारी १६७७)

हुसेनखान पळतो आहे, इकडे पाहण्यास फुरसत कोणाला होती! तरवारी आणि भाले सपासप चालले होते. पण हुसेनखान पळतो आहे, हे नागोजी जेध्याने पाहिले! शत्रूला पळून जाऊ द्यावयाचा काय? म्हणून नागोजीने पळणाऱ्या हत्तीच्या रोखाने

घोडा फेकला. हत्तीच्या नीट समोर येऊन त्याने आपल्या हातातील भाला खसकन हत्तीच्या मस्तकावर मारला ! त्या माराने हत्ती फिरला, मुरडला ! माघारा फिरला ! हुसेनखानाने खाली पाहिले ! तो त्याचा साक्षात् मृत्यूच घोड्यावर दिसला ! घाबरलेल्या खानाने स्वारावर नेम धरून बाण सोडला ! तो नागोजीच्या मस्तकात घुसला. भयंकर जखम होऊन नागोजी घोड्याखाली कोसळला ! इकडे खान पळून जाण्याचा प्रयत्न करू लागला. पण पळणार कसा ? एक नागोजी कोसळला म्हणजे मराठ्यांची फौज कोसळलेली नव्हती. धनाजी जाधव, हंबीरराव व इतरांनी हत्तीला गराडा घातला. धनाजीने हत्तीला खाली बसावयास लावून हुसेनखानला कैद केले. मराठी फौजेचा विजय झाला. हजारो घोडे, काही हत्ती, लूट फौजेच्या हाती लागली. विजय झाला. पण तो मिळविणाऱ्यांपैकी नागोजीच्या मस्तकात बाण घुसला होता. नागोजीचे वडील सर्जेराव स्वारीत होते. कर्तबगार तरणेबांड मूल मरणाच्या उंबरठ्यावर पाहून त्याचे मन हेलावले ! नागोजीच्या डोक्यातला बाण काढण्यात आला. पण त्याबरोबर नागोजीचा प्राणही गेला ! नागोजी गेले. मावळच्या डोंगरावरचे एक रसरशीत पुष्प गळून पडले ! पराक्रमाच्या शर्थीने त्यांचे नाव अजरामर झाले !

नागोजी लढाईत पडल्याची वार्ता घरी कारीला आली. घरदार दुःखात बुडाले. घरी नागोजीची तरुण पत्नी गोदूबाई होती. तिने सती जाण्याचे ठरविले. गावातील एका मळ्यात चिता रचून गोदूबाई सती गेल्या ! गोदूबाई आणि नागोजी यांनी आपला संसार संपविला. अगदी ऐन तरुणपणी संपविला; पण त्यांच्यामुळे कोप्पळ प्रांतातल्या कित्येकांच्या संसारांची सोडवणूक पठाणांच्या जाचातून कायमची झाली.

नागोजीचे वडील सर्जेराव स्वारीत होते. त्यांना पुत्रशोक झाला. पण सर्जेराव घरी परतले नाहीत. तशी मराठ्यांची परंपराच नव्हती. सर्जेराव पुढच्या मोहिमेसाठी महाराजांच्या बरोबरच रवाना झाले !



दक्षिणेतून महाराज रायगडला परत आले, तेव्हा ते मुद्दाम कारीला गेले. नागोजीच्या आईचे त्यांनी सांत्वन केले. नागोजीची आठवण म्हणून महाराज नागोजीच्या आईला दर दसऱ्यास एक शेर सोने पाठवीत असत.

अशी आहे शिवबांच्या एका शिपायाची कहाणी !

□ □ □

# ८ : फिरंगोजी नरसाळा



जुन्या काळी किल्ल्यांना अतिशय महत्त्व होते. गडकोट-किल्ले म्हणजे राज्याचा केवळ कणाच. गड-कोट-किल्ले हेच राज्याचे मूळ; गडकोट म्हणजेच राज्याचा खजिना; गडकोट म्हणजेच सैन्याचे बळ; गडकोट म्हणजे राज्यलक्ष्मी; गडकोट म्हणजे वसतिस्थळे; सुखनिद्रागार, राज्याचे प्राणसंरक्षक ! ज्या राज्यात गड-कोट-किल्ले नाहीत, त्या राज्याची स्थिती अतिशय नाजूक; सोसाट्याचा वारा येताच आभाळातील ढग जसे उधळून जातात त्याप्रमाणे राज्याची शत्रूपुढे अवस्था होते. या कारणासाठी शिवाजी राजांनी किल्ल्यांकडे प्रथमपासूनच लक्ष दिले होते.

किल्ले चाकण हा जुना किल्ला. प्रथम तो अहमदनगरच्या निजामशाहीकडे होता. निजामशहांकडून तो शहाजी राजांच्या जहागिरीत आला. पुण्याहून नाशिक रस्त्यावरची चाकण ही मोक्याची जागा होती. शहाजीच्या वेळेपासूनच ह्या किल्ल्याची किल्लेदारी फिरंगोजी नरसाळा यांच्याकडे होती. शिवाजी राजे जहागिरीची व्यवस्था पाहू लागल्यावर त्यांनी फिरंगोजी नरसाळा यांची किल्लेदारी चालू ठेवली होती.

फिरंगोजी नरसाळा शहाजी राजांच्या तालमीत तयार झालेले शूर सरदार होते. शहाजी राजांच्या बरोबर अनेक मोहिमांतून त्यांनी जातीने भाग घेतला होता. लढाईचा त्यांस चांगला अनुभव मिळालेला होता. शिवाय त्यांनी शहाजी राजांची निष्ठापूर्वक चाकरी केली होती. ती विचारात घेऊनच शहाजींनी त्यांची नेमणूक चाकणचा किल्लेदार म्हणून केली होती.

चाकण हा मैदानातील भुईकोट किल्ला. क्षेत्रफळ औरस-चौरस चारपाच चौरस मैलांचे. गडाभोवती मातीचा रुंद तट. तटाची उंची वीस पंचवीस हात होती. तटामध्ये मोठे मोठे गोल बुरूज होते. तटाला आणि बुरुजाला पाहणी करण्यासाठी आणि हल्ला करण्यासाठी छोटी मोठी भोके होती. तट आणि बुरूज मातीचा असला तरी भक्कम होता. किल्ल्यात तीनचारशे शिपायांची शिबंदी होती. दारूगोळा, धान्य यांचा मोठा साठा होता. किल्ला छोटा, भुईकोट असला तरी आजूबाजूच्या प्रदेशाचे रक्षण करण्यास त्याचा उपयोग होई. किल्ल्याच्या वाटेला बरेच दिवस कोणी गेले नव्हते.

दिल्लीच्या औरंगजेब बादशाहाचे मामा शाइस्तेखान शिवाजी राजांच्या बंदोबस्तासाठी आले. ते राजांना काहीच किंमत देत नसत. सभोवतालच्या मंडळींना तो म्हणे, "शिवाजी शिवाजी म्हणजे काय आहे ? मामुली बंडखोर चोर ! त्याची किंमत ती काय ? हातापायांच्या बोटांची वाढलेली मामुली नखेच ! पुण्यापर्यंत जाताच बंडखोराला कैद करतो आणि त्याची ठाणी जप्त करून त्याचा पुरा बंदोबस्त करतो."

पुण्यास येण्याआधी शाइस्तेखान यांनी चाकणच्या किल्ल्याला वेढा घातला. इ. स. १६६० सालचा जून महिना होता. चारदोन दिवसातच चाकणचा किल्ला सर करू, ही

खानाची अपेक्षा होती. कारण चाकण हा छोटा भुईकोट किल्ला किंवा गढी ! ती सर करणे म्हणजे अफाट मोगल सैन्याच्या हातचा मळ होते. शिवाय किल्ल्याचे मालक शिवाजी राजे स्वतः पन्हाळा किल्ल्यात विजापूरकरच्या सैन्याने वेढले गेले होते.

वेढा सुरू झाला. किल्ल्याची मोर्चेबंदी झाली. आतील माणूस बाहेर पडू शकेना व बाहेरचा कोणी आत जाऊ शकेना. तोफांचा दूरवरून भडिमार झाला. बाहेरून गोळीबाराची सरबत्ती झाली. गोळीबाराची बरसात करीत मोगल सैन्य पुढे सरू लागले. तोच आतूनही त्याचे स्वागत गोळीबारानेच झाले. चाकणच्या किल्ल्याच्या तटावरून आतील सैन्याने दारूगोळ्यांनी भडिमार केला. मोगल सैन्याला भाजून काढले. मोगलांच्या तोफांचे गोळे मातीच्या भिंताडात रुतून बसत. कोटाजवळ जावे तर आतील भडिमार ! काही उपाय चालेना. दिवस भराभर जाऊ लागले. जवळ जवळ वीस-पंचवीस हजार सैन्य, त्याचा तोफखाना-तब्बल पन्नास दिवस भांडला. पण किल्ल्याचे ढेकूळ पडेना. खानाच्या मनास मोठा चटका लागला. हाती घेतलेली कामगिरी फारशी सोपी नाही अशी त्यांना खात्री वाटू लागली.

तिकडे शिवाजी राजे पन्हाळ्याच्या वेढ्यातून निसटले ! महाराज पन्हाळ्याच्या वेढ्यातून निसटले या गोष्टीचा शाइस्ते-खानावर फार परिणाम झाला. आतील मराठ्यांच्या सैन्याला हिंमत आली. आपल्याला आता मदत येईलच येईल, अशा खात्रीने आतील सैन्य झुंजू लागले !

किल्ल्याच्या बुरुजाला भगदाड पाडल्याखेरीज किल्ल्यात घुसता येणार नाही, असा विचार करून किल्ल्याच्या तटाला सुरुंग लावणाराला शाइस्तेखानाने मोठे बक्षीस लावले. बऱ्याच

विचाराअंती शाइस्तेखानाच्या फौजेत एका युक्तीचा जन्म झाला. वेढ्यातील मोर्चापासून थेट बुरुजापर्यंत जमिनीखालून भुयार खणीत न्यावयाचे. भुयार बुरुजाखाली पोहोचल्यावर तेथे सुरुंगाची दारू भरावयाची. दारूला बत्ती देऊन होणाऱ्या स्फोटामुळे बुरूज उडवून देऊन त्यास मोठे भगदाड पाडावयाचे, त्यातून आत घुसून किल्ला सर करावयाचा अशी ही मोठी धाडसी युक्ती होती. खानाकडे पैसा, माणसे, सामान यापैकी कशाचाही तोटा नसल्यामुळे ह्या अभिनव योजनेचे काम गुप्त-पणे सुरू झाले. किल्ल्यावर नेहमीप्रमाणे चोहोकडून हल्ले होत होते. त्या हल्ल्यांना आतील बाजूने चोख उत्तरही मिळत होते. दिवसेंदिवस किल्ल्यातील दारूगोळा, अन्नधान्य यांचा साठा मात्र कमी कमी होत होता. बाहेरून मदत येईल, या आशेवर मराठे जवान मोठ्या हिमतीने झुंज देत होते. फिरंगोजी नरसाळे यांचे नेतृत्व इरेला पडले होते.

किल्ल्यावर वेढा पडलेल्याला आता पंचावन्न दिवस झाले होते. हा पंचावन्नावा दिवस चाकणच्या किल्ल्याचा घातवार म्हणूनच उजाडला की काय कोण जाणे !

शाइस्तेखानाचे सैन्य हल्ला करण्याचा तयारीने सज्ज झाले. इकडे मराठेही तटावर त्यांच्याशी मुकाबला करण्यास सज्ज होते. खानाची भुयारातून दारू ठासण्याची योजना तयार झाली होती. हल्ल्याची सर्व योजना व्यवस्थित आखून झाल्या-वर खानाने दारूला बत्ती देण्याचा हुकूम दिला. तिकडे तटावर मराठे प्रतिकार करण्याच्या पवित्र्यात उभे होते.

सुरुंगांनी पेट घेतला. त्याचे प्रचंड स्फोट झाले. त्या स्फोटांमुळे किल्ल्याचा आग्नेय दिशेचा बुरूज आकाशात उडाला. बुरुजावरची माणसे, जवान, तोफा, दगड हवेत उडाले. स्फोटाचे

प्रचंड आवाज झाले. वातावरण धुळीने, धुराने व जळक्या दारूच्या वासाने भरून गेले. हवेत उडालेली मराठी माणसे मरून पडली. किल्ल्याला खिंडार पडले ! हे कसे घडले किंवा अजून काय घडणार आहे याचा किल्ल्यातील लोकांना अजिबात अंदाज येईना. त्यांची क्षणभर गोंधळल्यासारखी स्थिती झाली.

किल्ल्याला खिंडार पडलेले पाहताच हल्ल्यासाठी तयार असणारी मोगल फौज किल्ल्यावर चालून आली. महापुराच्या पाण्याच्या लोंढ्याप्रमाणे फौजेचा लोंढा खिंडारातून किल्ल्यात घुसू लागला. शिपायांच्या व त्यांच्या सरदारांच्या आनंदाला पारावर उरला नव्हता. वाघाने शेळीचा फडशा पाडावा, असा आता किल्ल्याचा फडशा पाडू अशी त्यांची कल्पना होती. ती वावगी मुळीच नव्हती. फिरंगोजी हे सर्व पाहात होते. आता त्यांच्या कसोटीचा क्षण आला होता. विजयाच्या आशेने मोगल बेभान झाले होते.

पण घडले मात्र निराळेच ! किल्लेदार फिरंगोजी नरसाळे यांनी आपल्या सैनिकांची खिंडारापाशी फळी उभी केली. त्यांनी हातात पट्टे चढविले. दातओठ खात फिरंगोजी आपल्या साथीदारांसह आत येणाऱ्या मोगल शिपायांवर तुटून पडले. शस्त्रांची खणाखणी सुरू झाली. रणचंडीला नरबलीचा नैवेद्य पोटभर मिळू लागला. मोगलाचा पहिला हल्ला साफ कोलमडून पडला. मोगलांनी नेट लावला. हल्ल्यामागून हल्ले होऊ लागले. एकाकी लढणाऱ्या मराठ्यांनी ते हल्ले मागे फिरवले. सात-आठशे मोगल शिपाई रणभूमीवर ठार होऊन पडले. कित्येक जखमी झाले. किल्ल्याला खिंडार पडूनही सबंध दिवसभर लढूनही मोगल किल्ल्यात पाय टाकू शकले नाहीत ! मराठ्यांनी आपल्या पराक्रमाची शर्थ केली. छातीचा

कोट केला. किल्ल्याचे रक्षण प्राणपणाने केले! दिवस मावळला. रात्र झाली. पण संकट मात्र टळलेले नव्हते. झुंजीत मराठ्यांचे शिपाईही बरेच ठार झाले. जे शिल्लक होते ते दमले होते. काही जखमी होते. रात्र झाली तरी मराठे तटाशी शत्रूला अडविण्यासाठी उभे होते. मोगलांनीही माघार न घेता खिंडारापाशी ठाण मांडले.



दुसरा दिवस उजाडताच मोगल फौजेने आपली शक्ती एकवटून हल्ला केला. तो हल्ला अडविण्याचा मराठ्यांचा प्रयत्न तोकडा पडला. शक्तीच कमी पडली. सैन्यबळ आटत चालले ोते. तरीही मराठे लढत होते. शाईस्तेखान स्वतः किल्ल्यात घुसला. बेभान होऊन प्राणपणाने लढणारे मराठे वीर आणि

त्यांचे अग्रणी फिरंगोजी पाहून त्याचे मन थरारले ! आश्चर्य-चकित झालेल्या खानाने फिरंगोजी नरसाळे यांना ओरडून लढाई थांबविण्यास सांगितली ! पट्टे थांबले ! लढाई थांबली ! शाइस्तेखानाने फिरंगोजीचा गौरव केला. मी असा हिंमत-बहाद्दर शिपाई पाहिला नाही, असे उद्‌गार काढले ! त्याने फिरंगोजीस मोगलांच्या सैन्यात येण्याचे आवाहन केले. जहागिरी, मानमरातब यांची आशा दाखविली. फिरंगोजींनी त्या सर्वांस नकार दिला. खानाने फिरंगोजी आणि त्याचे शिपाई यांना किल्ल्यातून निघून जाण्यास परवानगी दिली. निरुपाय झाल्याने मराठे किल्ल्यातून निघून गेले ! छप्पन्न दिवसांच्या प्रयत्ना-नंतर एक भुइकोट गढी मोगलांच्या हाती पडली ! त्यांनी विजयोत्सव केला. खैरात वाटली. बक्षिसे दिली. चाकणचे नाव बदलून ते इस्लामाबाद असे ठेवले ! (दि. १५ ऑगस्ट १६६०)

सदरेत महाराज बसले होते. ते सचित होते. फिरंगोजी खाली मान घालून उभे होते. मनाचा हिय्या करून जड शब्दांनी ते बोलले, " महाराज, किल्ला गमावला. मी अपराधी आहे. मी गुन्हेगार आहे. शिक्षा द्या ! "

" गुन्हेगारी कसली ? फिरंगोजी तुम्ही आपल्या पराक्रमाची शर्थ केलीत. इतके दिवस दम धरून किल्ला लढविलात हीच तुमची मोठी कामगिरी आहे. मोगल काय इथे कायम राहणार आहे ? आज आलेला चार दिवसांचा हा पाहुणा ! " महाराजांचे उद्‌गार ऐकून फिरंगोजी सद्‌गदित झाले. थोड्याच दिवसात महाराजांनी फिरंगोजी यांची भूपाळ-गडावर किल्लेदार म्हणून नेमणूक केली. भूपाळगड सातारा जिल्ह्यातील एक किल्ला होता. अडीअडचणीला उपयोगी पडावी म्हणून महाराजांनी त्यावर मोठा खजिना आणि साधनसामग्री भरून ठेवली होती.

जाऊन मोठा विजय मिळवून आले.
हाराज कर्नाटकात असून सुद्धा येथील
वली होती. स्वराज्याची चिंता आता आपल्या
रभारी मंडळी चांगली वाहतील अशी महा-
ा खात्री पटली. स्वराज्य रक्षणाची चिंता कमी झाली,
पण घरातील नव्या चिंतेने मात्र शिवाजी राजे अस्वस्थ झाले !

युवराज संभाजी राजे यांचे वागणें बिघडले. घरात कुरबूर सुरू झाली. युवराजांच्या वागण्याने महाराज अस्वस्थ झाले. राजांनी संभाजीला सज्जनगडावर समर्थ रामदास यांच्याकडे पाठविले. तेथील वातावरणात ते रमले नाहीत. अचानकपणे ते उठले व आपल्या पत्नीसह आणि मुलासह पळाले ! पळालेले युवराज थेट मोगलांकडे गेले. ते दिलेर-खानाला जाऊन सामील झाले. महाराजांना कमालीचे दुःख झाले. दिलेरखानाच्या आनंदाला पारावर उरला नाही. त्यांनी नौबती वाजविल्या. संभाजीचा सन्मान केला. त्याला हत्ती बक्षीस दिला. मोगलांच्या तर्फे संभाजीला दिलेरखानाने सप्त-हजारी मनसब दिली. मराठ्यांच्यामध्ये दुही पेटवून त्यांच्या नायनाट करता येईल या आनंदात खान गर्क झाला. दिलेर-खानाची नजर स्वराज्यातील लक्ष्य धुंडू लागली. प्रथम त्याच्या नजरेस भूपाळगड दिसला. खानाने युवराजांसह भूपाळगडापाशी मोर्चे आणले ! गडाजवळच असणाऱ्या टेकाडावर मोगलांचा तोफखाना चढला. तेथून किल्ल्यावर गोळ्यांचा भडिमार सुरू झाला. किल्ल्यामधूनही त्याला चोख उत्तर मिळाले. दोन्ही बाजूंची माणसे मेली. तरी फिरंगोजी किल्ला लढविण्याची पराकाष्ठा करीत होते ! किल्ल्यावरून होणारा प्रतिकार तिखट होता. मोगलांच्या घशात किल्ला सहजासहजी थोडाच पडणार होता?

शिवाजी राजांचे चिरंजीव, युव
बाजूने मोर्चात उभे होते. त्यांनी कि
पाठविला. " मुकाटच्याने लढणे थांबवून किल्ल
नाही तर शिरच्छेद करीन ! "

धन्याच्या मुलाचा निरोप ऐकून किल्ल्यावरील लोकां मनात चलबिचल झाली. फिरंगोजी शूर, धैर्यवान, निष्ठावान खरे, पण त्यांच्यासमोर मोठा बिकट प्रसंग आला. धन्याच्या मुलावर तोफांचे गोळे कसे सोडावयाचे? शेवटी त्यांनी आणि त्यांच्या सबनिसांनी किल्ला सोडण्याचे ठरविले. रातोरात किल्ला सोडून किल्लेदार व किल्ल्याचे सबनीस निघून गेले. गड तसाच उघडा पडला. (दि. २ एप्रिल १६७९) दुसऱ्या दिवशी किल्ला संभाजीराजांनी घेतला. आतील मराठे शिपाई संभाजी राजांना हात जोडून शरण आले होते ! या शरण आलेल्या सात-आठशे शिपायांचा एक एक हात संभाजी राजांच्या हुकुमाने तोडण्यात आला. काहींना गुलाम करण्यात आले. दिलेरखानाने किल्ल्याची तटबंदी मोडून टाकली. किल्ला निकामी झाला.

किल्ल्याचे राखणदार फिरंगोजी शिवाजी राजांकडे दाखल झाले. त्यांनी सर्व हकीकत सांगितली. महाराज संतापले. " शत्रू म्हणून युवराज पुढे आला म्हणून काय झाले. तोफेच्या गोळ्यांनी त्याला का उडविला नाहीस ! ममता दाखविण्याची गरज काय ? आता पुनः असे होता कामा नये," असे म्हणून महाराजांनी निषेध केला. हुकुमाची अमलबजावणी व्हावी यासाठी महाराजांनी सर्वांना खलिते पाठवून आज्ञा दिली: " शत्रू म्हणून कोणीही येवो. प्रत्यक्ष युवराज आले तरीही लढावे ! तोफांचे गोळे वाजवावे ! किल्लेमात्र सोडू नयेत ! "

IRBK-0111453

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
दा. क्र ... नों. दि ................